मुंबई ▪ सांगली ▪ कोल्हापूर ▪ नवे विचार...नवी सुरुवात ▪ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक
# हॅलो प्रभात

▪ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

▪ सांगली ▪ कोल्हापूर ▪ सातारा ▪ पुणे ▪ अहिल्यानगर ▪ वर्ष : ६ ▪ अंक : १२५ ▪ शुक्रवार, ०८ ऑगस्ट २०२५ ▪ किंमत : ३ रुपये ▪ पाने : ४




# ‘स्थानिक’ च्या निवडणुकीत तरुण तुर्कांची त्सुनामी?

## चौरंगी पंचरंगी लढतीचे वारे ; कुरुक्षेत्रावर प्रत्येकाला उमेदवारी शक्य नाही



**सांगली : विशेष प्रतिनिधी**

स्थानिक ’स्वराज्य’च्या महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, नगरपरिषद, निवडणुकांमध्ये तरुण तुर्कांची त्सुनामी येण्याचे संकेत मिळू लागले आहेत. २०२४ मधील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये सर्वच पक्षांच्या तरुणांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला होता. उमेदवारांकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उमेदवारी देऊ असा शब्दही देण्यात आला. आणि त्या शब्दाच्या आशेवर त्यांनी आपल्या समर्थक उमेदवाराच्या विजयासाठी केलेले जीवतोड प्रयत्न त्यामुळेच यावेळी निवडणूक लढवायचीच अशा दृढ इच्छेप्रत हे उमेदवार आले आहेत. महायुती महापालिका निवडणूक स्वबळावर आणि महाविकास आघाडी संघटित निवडणूक लढवण्याच्या तयारीत असली तरी जागा कमी आणि ’गुडघ्याला बाशिंगे बांधून तयार असलेले इच्छुक’ अधिक या विसंगतीमुळे महापालिका असो की जिल्हा परिषद निवडणूक असो, निवडणुका पंचरंगी होण्याची शक्यता राजकीय जाणकारण मधून व्यक्त केली जात आहे

२०१७ सालच्या निवडणुकांप्रमाणेच यंदाची स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक होणार असल्यामुळे खुल्या गटातील उमेदवारांसाठी फारच थोड्या जागा शिल्लक राहणार आहेत. महिलांसाठी आरक्षण, ओबीसी आरक्षण, अनुसूचित जाती जमातीचे आरक्षण यामुळे इच्छुक अधिक असल्यामुळे प्रत्येकाला उमेदवारी देणे कोणत्याच राजकीय पक्षाला शक्य होणार नाही.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत सांगली जिल्ह्यात आमदार डॉ.विश्वजीत कदम, सत्यजित देशमुख, गोपीचंद पडळकर, रोहित पाटील, सुहास बाबर हे पाच तरुण तुर्क आमदार झाले. राजकारणातील एक पिढी मागे पडत असून त्याची जागा घेण्यासाठी नवी पिढी पुढे येत येत आहे. राजकीय वारसा पुढे चालविण्यासाठी आपल्या घरातील मुलांना पुढे करण्यासाठी जेष्ठ नेत्यांची धडपड सुरू आहे . या पार्श्वभूमीवर तरुण तुर्क उमेदवारांची मोठी फलटण या निवडणुकीत उतरेल असा अंदाज राजकीय क्षेत्रात जाणकारांमधून व्यक्त केला जात आहे

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी महायुतीतील भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेनेने आयात उमेदवारांना प्राधान्य दिले. येणाऱ्यांनी उमेदवारीचा शब्द घेऊनच आत पाऊल टाकले त्यामुळे भाजप असो, की राष्ट्रवादी असो, की शिंदे सेना असो, ज्यांना उमेदवारीचा शब्द देऊन पक्षात घेतले आहे त्यांना उमेदवारी द्यावीच लागणार आहे. तथापि आयात करण्यात आलेल्या



उमेदवारांमुळे एकनिष्ठ इच्छुकांवर अन्याय होणार आहे. बंडखोरी रस्त्यावर येऊ शकते, आणि महायुतीतील तीन घटक पक्षांना नेमका हाच मोठा धोका आहे. महायुतीतील भाजप,अजितदादांची राष्ट्रवादी आणि एकनाथ शिंदेंची शिवसेना यांच्या तुलनेत महाविकास आघाडीला बंडखोरीचा धोका कमी आहे. महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी शरद पवार पक्षातून तसेच काँग्रेसमधून पक्षांतर करणाऱ्यांची संख्या अधिक आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीतून आणि काँग्रेस पक्षातून नेते जाऊ लागल्यामुळे येथे राजकीय पोकळी निर्माण होत आहे, तर महायुतीतील घटक पक्षांमध्ये त्यांचा भरणा होत असल्यामुळे तेथे राजकीय सूज येत आहे, त्यामुळे महाविकास आघाडीला जेथे उमेदवार शोधावे लागणार आहेत, तेथे महायुतीतील घटक पक्षांना मात्र उमेदवारी देताना फारच चौकस राहावे लागणार आहे. एकसंघ शिवसेना असतानादेखील शिवसेनेचा सांगली महापालिका कार्यक्षेत्रात फारसा राजकीय नव्हता, महापालिकेत सदस्य निवडून आणण्याची ताकद त्यावेळी शिवसेनेत नव्हती, आता तर एका शिवसेनेचे दोन शिवसेना झाल्या आहेत. त्यात ठाकरे सेनेतील नेत्यांना आपल्याकडे खेचण्यासाठी शिंदे सेनेने ’ऑपरेशन टायगर’ सांगली जिल्ह्यात सुरू केले आहे याचा विचार काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार पक्षाचे नेते नक्कीच करतील. निवडून येण्याची शक्यता नसल्याने शिवसेनेसाठी जागा वाया का घालवायच्या? या दृष्टिकोनातून विचार करून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शिवसेनेला बाजूला ठेवून महापालिका निवडणुकीत काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाची आघाडी निवडणुकीला सामोरे जाईल असाही अंदाज व्यक्त केला जात आहे. ठाकरे सेनेने उमेदवार उभे केले तरी मत विभाजनाचा फारसा परिणाम होणार नाही या विश्वासात काँग्रेस आघाडीचे नेते असल्याचीही चर्चा जोरदारपणे केली जात आहे . महायुतीची खरी सत्वपरीक्षा जागा वाटपाच्या वेळीच होणार आहे. उमेदवारी नाकारले गेलेले महाविकास आघाडीच्या आश्रयाला येण्याची शक्यता आहे, आणि याच संधीची प्रतिक्षा काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नेते करतील असाही अंदाज व्यक्त केला जात आहे. आतापर्यंत ठाकरेसेनेत मोठ्या प्रमाणावर गळती झाली असून अद्याप ती सुरूच आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी आर्थिक प्रबळ उमेदवारांची गरज असते. परंतु अशा उमेदवारांचा शिवसेनेकडे पूर्णपणे अभाव आहे, त्यामुळेच शिवसेनेची स्थिती या निवडणुकीत दयनीय होण्याची होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. सांगली महापालिका निवडणुकीत अपक्षांची संख्या मोठी असणार आहे, ज्या पक्षातील अपक्ष अधिक असतील त्या पक्षाला मतविभाजनाचा झटका मोठ्या प्रमाणावर बसणार आहे. इच्छुकांची संख्या महायुतीतील घटक पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे अनेकांना नाराज व्हावे लागणार आणि मग ही अपक्षांची फौज निवडणूक मैदानात उतरण्याची दाट शक्यता आहे. ज्या पक्षातील अधिक अपक्ष निवडणूक रिंगणात उतरतील, त्या पक्षाला मतविभाजनाचा फटका बसणार आहे. त्या दृष्टिकोनातून महायुतीतील भाजप, राष्ट्रवादी आणि शिंदेसेना रेड झोनमध्ये आहे, तर त्या तुलनेत काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्ष सुरक्षित आहे. काही असले तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत तरुण तुर्कांची फौज मोठ्या प्रमाणावर उतरण्याच्या तयारीत आहे.

## संक्षिप्त...

### शिवाजी विद्यापीठात पुनर्प्रवेश परीक्षा १८ ऑगस्टला

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

शिवाजी विद्यापीठ अधिविभागातील अद्याप सुमारे ४०६ जागा रिक्त राहिल्या आहेत. या रिक्त जागांसाठी १८ ऑगस्टला दुसऱ्यांदा पुनर्प्रवेश परीक्षा घेण्याचा निर्णय झाला आहे.

विद्यापीठातील विविध अधिविभागांतील अभ्यासक्रमांच्या दुसऱ्या फेरीअखेर ११०४ जागा भरल्या आहेत. मात्र, अद्यापही २६ अभ्यासक्रमांच्या ४०६ जागा अजून रिक्त आहेत.

### कोल्हापूर जिल्हा आता ‘ग्रीन डे’साठी सज्ज

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

आरोग्यदायी आणि शाश्वत जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी कोल्हापूर जिल्हा प्रशासनाने ‘ग्रीन डे’ ही अभिनव संकल्पना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

जिल्हाधिकारी अमोल येडगे आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा उपक्रम महसूल विभाग आणि जिल्हा परिषदेच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे.

### देवस्थान अध्यक्षपदासाठी निवडणुकीनंतरच फैसला

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या अध्यक्षपदासाठी कुणाची वर्णी लागणार, ही चर्चा सुरू असतानाच देवस्थानच्या अध्यक्षपदाचे बिगुल कोल्हापूर महापालिका व जिल्हा परिषदेच्या निवडणुकीनंतरच वाजणार, हे निश्चित झाले आहे. भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ स्तरावरच हा निर्णय घेण्यात आला आहे.

## सांगलीची रुचा अट्टल ‘मिस इंडिया २०२५’ स्पर्धेत तिसरी

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगलीच्या रुचा अट्टल हिने ‘द इंटरनॅशनल ग्लॅमर प्रोजेक्ट’ सीझन ४ अंतर्गत झालेल्या ‘मिस इंडिया २०२५’ सौंदर्य स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकावून इतिहास रचला आहे.

मराठी मातीतील अभिमानास्पद आणि मारवाडी संस्कृतीचा गौरव असलेली रुचा ही इंटेरिअर आणि लँडस्केप डिझाइनची पदवीधर असून, ती एक उत्साही कलाकार, मॉडेल, उद्योजिका आणि प्राणीप्रेमी आहे.



रुचाने या मंचावर आत्म विश्वास आणि समाजभान यांचा संगम साधत ‘बाल शिक्षण’ या सामाजिक विषयासाठी आवाज उठवला. ‘शिकणं गर्भात असतानाच सुरू होतं’ या तत्त्वज्ञानावर तिचा ठाम विश्वास आहे. या विजयानंतर तिला ‘मिस युनिव्हर्स वर्ल्ड’ आणि प्रसिद्ध अभिनेत्री संगीता बिजलानी यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

रुचाने या यशासाठी TIGP चे संस्थापक डॉ. अक्षता प्रभू आणि डॉ.स्वरूप पुराणिक यांचे मनःपूर्वक आभार मानले, आणि सांगितले की

या मंचामुळे तिला देशभरातील असंख्य मुलींना प्रेरणा देण्याची संधी मिळाली. रुचाच्या या यशामुळे संपूर्ण सांगली आणि महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

## मनपाचा कचरा उठाव प्रश्न गंभीर



**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रं.१ व २ च्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलीत करण्यासाठी एकुण ७ कॉम्पॅक्टर असुन त्यातील फक्त १ कॉम्पॅक्टर सुरु असून उर्वरित ६ कॉम्पॅक्टर किरकोळ दुरुस्ती अभावी बंद आहेत.

महानगरपालिकेचे स्वत:चे वर्कशॉप असताना त्या ठिकाणी फक्त आणि फक्त गाड्या धुण्याचेच काम केले जाते. असून अडचण आणि नसून खोळंबा अशी अवस्था वर्कशॉप विभागाची झालेली आहे. महापालिका क्षेत्रात कचरामुक्त हे धोरण राबविले जात असल्यामुळे घंटा गाड्याच्या माध्यमातून संकलीत केलेला कचरा थेट कॉम्पॅक्टरमध्येच क्रॉसिंग केला जातो पण कॉम्पॅक्टरच उपलब्ध नसलेने घंटागाड्या कॉम्पॅक्टरच्या प्रतिक्षेत गाड्या थांबून रहात असलेने घंटागाडीच्या रांगाच्या रांगा लागल्याने कचरा संकलनावर विपरीत परिणाम होत आहे.

वहाने दुरुस्ती करणाऱ्या मक्तेदारांची बिले अदा न केल्यामुळे मक्तेदारांकडून गाड्यांची दुरुस्ती थांबविलेली आहेत. त्यामुळे नागरीकांकडून कचरा कोठे टाकायचा असा प्रश्न निर्माण झालेला आहे. या प्रकरणाची वरिष्ठांकडून दखल घेऊन कचरा उठाव सुरळीत करण्यात यावा अशी मागणी माजी नगरसेवक जगन्नाथ ठोकळे यांनी केली आहे.

## अद्यावत कौशल्यांमुळे विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना नवी झेप मिळणार : अनिल बागणे

**यड्राव : हॅलो प्रभात**

मुलांना उद्योजक बनविण्यासाठी व चांगल्या कंपनीत नोकरी मिळावी या उद्देशाने महाविद्यालय इंडस्ट्रीयल ट्रेनिंग व इंटर्नशीपचा समावेश करीत आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानासोबत औद्योगिक पूरक कौशल्य शिकावे. ह्या अद्यावत कौशल्याचे उपयोग स्वत:चा उद्योग उभारण्यासाठी, चांगल्या कंपनीत नोकरी व जीवनात यशस्वी बनण्यासाठी होणार आहे. त्यामुळे शरदमधील विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना नवी झेप मिळणार आहे, असे प्रतिपादन शरद इन्स्टिट्युट



ऑफ टेक्नॉलॉजीचे एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर अनिल बागणे यांनी केले. ते यड्राव येथील शरद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, पॉलिटेक्निकमध्ये प्रथम वर्ष विद्यार्थी स्वागत समारंभात बोलत होते.

श्री.बागणे म्हणाले, जीवनात यशस्वी होण्यासाठी आत्मविश्वास महत्वाचा असतो. तो आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होण्यासाठी शरद पॉलिटेक्निकमध्ये विविध कौशल्ये व आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यात येते. औद्योगिक क्षेत्रात आवश्यक असणारे तंत्रज्ञान, कौर्सेसही महाविद्यालयात सुरु करण्यात आले आहे. तसेच जीवनात यशस्वीतेसाठी शॉर्टकट नाही, प्रामाकणिकपणा व प्रचंड कष्ट आणि त्याचबरोबर व्यक्तीमत्वातील नम्रता हे गुण अंगीकारला तर यश हमखास मिळतं. शिक्षण संस्था ह्या फक्त शिक्षणाचीच मंदिरे नसून ती संस्काराचीही मंदिरे आहेत. हा संदेश शरद पॅटर्न देतो. प्रत्येकाने आपल्या आई, वडील व शिक्षकांचा आदर राखला पाहीजे.

दरम्यान महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. ताशीलदार यांनी महाविद्यालयची माहिती दिली. प्रथमवर्ष विभागप्रमुख प्रा.आगलावणे यांनी विभागाची माहीती देवून विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी प्रवेश घेतलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# चीनमधून कर चुकवून निकृष्ट बेदाण्यांची आयात

## सांगली जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान

## आ.जयंतराव पाटील; सरकार या विषयावर गंभीर का नाही?

**सांगली : हॅलो प्रभात**

चीनमधून होणारी बेदाण्यांची बेकायदा आयात त्वरित थांबवण्यात यावी यासाठी काल माझ्या सांगली जिल्ह्यातील द्राक्ष व बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढला होता. खरंतर ही बाब मी पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने सरकारच्या निदर्शनास आणून दिली होती. मात्र त्यावर काहीच निर्णय घेतला गेला नाही. त्यामुळे सरकार या विषयावर गंभीर आहे की नाही असा प्रश्न आम्हाला पडतो आहे यावर जयंतराव पाटील यांनी सरकारला धारेवर धरले.



जयंतराव पाटील यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून प्रतिक्रिया दिली आहे. त्यात ते म्हणाले की, हवामानाच्या लहरीपणामुळे यंदाच्या द्राक्ष हंगामात उत्पादनात मोठी घट झाली. परिणामी गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या हंगामात बेदाणा उत्पादन घटले आहे. त्यात चीनमधून कर चुकवून निकृष्ट बेदाण्यांची मोठ्या प्रमाणावर आयात होत आहे. या दुहेरी संकटामुळे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे आणि परकीय गंगाजळीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. शेतकऱ्यांना अपेक्षित असलेल्या दराचे गणित विस्कटले आहे असे ते म्हणाले.

सांगली, नाशिक, जळगाव, सातारा अशा विविध भागांमध्ये द्राक्ष उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने आहेत. हा द्राक्ष बागायतदार शेतकरी जगला पाहिजे या उद्देशाने त्यांनी पिकविलेल्या बेदाण्याचा शालेय पोषण आहारात समावेश करुन द्राक्ष बागायतदार शेतर्कयांचे मजबुतीकरण करावे अशी मागणी आम्ही लावून धरतोय. एकिकडे अवकाळी पावसामुळे द्राक्ष बागायतदार शेतर्कयांचे कंबरडे मोडले आहे. त्यांना कोणत्याही प्रकारची मदत या सरकारने केलेली नाही. तर दुसरीकडे हे सरकार चीनमधील बेदाणा आयात करुन नुकसानग्रस्त द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहे अशी टीका त्यांनी सरकारवर केली. शासनाची उदासीन भूमिका द्राक्ष उत्पादकांच्या मुळावर उठली आहे असे म्हटले तर वावगं ठरणार नाही. सरकारने तात्काळ बेकायदेशीर आयात झालेल्या बेदाण्यांची विक्री थांबवावी व शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी त्यांनी केली आहे.






## उत्तराखंडसारख्या दुर्घटनेमागचे कारण नेमकेपणाने जाणून घेणे आवश्यक

हिमालयीन पर्वतराजीत वसलेल्या उत्तराखंडसारख्या राज्याला नैसर्गिक आपत्ती काही नवीन नाहीत. ढगफुटीपासून महापुरापर्यंत आणि हिमस्खलनापासून भूकंपापर्यंत अनेक आपत्ती तिथे अधून मधून येत असतात. त्या नैसर्गिक असल्या, तरी निसर्गातील वाढत्या मानवी हस्तक्षेपामुळे, विकासाच्या कथित संकल्पनांतून साकारलेल्या प्रारूपामुळे आणि वेड्यावाकड्या बांधकामांमुळे त्या मानवी आपत्तीही ठरतात. अशा प्रकारच्या संकटांचे सूचन निसर्ग वेगवेगळ्या प्रकारे करीत असतो; परंतु त्यांकडे दुर्लक्ष करण्याची वृत्तीही विकसित झाली आहे. त्याची किंमत संकटांच्या वेळी चुकवावी लागते. उत्तराखंडमधील उत्तरकाशी येथे सध्या आलेल्या आपत्तीत अशीच किंमत चुकवावी लागत आहे. तेथील धराली गावाच्या परिसरात ढगफुटी झाल्याचे सांगितले जात असून, त्यात आतापर्यंत पाच जणांचा मृत्यू झाला आहे, तर शंभराहून अधिक बेपत्ता आहेत. धराली गावाचा निम्मा भाग चिखलात गेला असून, अनेक घरे आणि इमारती वाहून गेल्या आहेत. मदत आणि बचावकार्य सुरू असले, तरी पावसामुळे त्यात अडथळा येत असल्याचे दिसते. ही दुर्घटना ढगफुटीमुळे झाली की हिमस्खलनामुळे असा प्रश्न आता उपस्थित होत आहे; कारण दुर्घटना घडली त्यावेळी जेमतेम ६.५ मिलिमीटर पाऊस झाल्याचे हवामान खात्याचे म्हणणे आहे. या काळात संपूर्ण उत्तरकाशी जिल्ह्यातील सर्वाधिक पाऊस २७ मिलिमीटर होता. इतक्या कमी पावसामुळे महापूर येण्याची शक्यता नसल्याकडे शास्त्रज्ञ अंगुलिनिर्देश करीत आहेत. शंभर चौरस किलोमीटर क्षेत्रफळात एका तासात शंभर मिलिमीटरहून अधिक पाऊस झाला, तर ढगफुटी झाली, असे मानले जाते. ही ढगफुटीची शास्त्रीय व्याख्या असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे धराली दुर्घटना ढगफुटीमुळे नव्हे, तर हिमस्खनामुळे घडली असण्याची शक्यता वर्तविली जाते. त्यामुळे ही शक्यताही तपासून पाहायला हवी. उत्तराखंड हे उंचावरील ठिकाण आहे. समुद्रसपाटीपासून ८०० ते ६९०० मीटर उंचीवरील या राज्यात मोठ्या संख्येने हिमनद्या आहेत. एका पाहणीनुसार तिथे बाराशेहून अधिक हिमनद्या असून, त्यांपैकी काही धोकादायक आहेत. या हिमनद्यांमुळे उत्तरेकडील नद्यांना बारमाही पाणीपुरवठा होत असला, तरी पावसाळ्यात त्यांच्यामुळे धोकाही संभवतो. मोठा पाऊस झाला की तो हिमतलावांत साठून राहतो. मात्र, पाण्याची आवक वाढत राहिल्यास तलाव फुटून महापुराची स्थिती निर्माण होते. धराली गावातील सध्याची दुर्घटना याचमुळे झाली असावी, असा तज्ज्ञांचा कयास आहे. विद्यमान दुर्घटनेमागे ढगफुटीचे किंवा हिमस्खलनाचे कारण असले, तरी ते नेमकेपणाने जाणून घेणे आवश्यक आहे. अशा दुर्घटना टाळता येत नसल्या, तरी त्यांची शक्यता कमी करण्याचा प्रयत्न करता येतो. शिवाय, त्यामुळे कमीत कमी जीवितहानी होईल, या पद्धतीने नियोजन करता येते. किनारपट्टीच्या प्रदेशात चक्रीवादळामुळे होणारी जीवितहानी अशा प्रयत्नांद्वारे कमी करण्यात यश येत आहे. हिमालयीन पर्वतरांगा असो की पश्चिम घाटातील डोंगररांगा, सागरकिनारे असो की नद्या, या सर्व ठिकाणी मानवी हस्तक्षेप वाढला आहे, यात शंकाच नाही. भौतिक विकासाच्या साचेबद्ध कल्पनेमुळे खाणकाम, उपसा, जंगलतोड आणि बांधकाम या सर्व गोष्टींमुळे निसर्गातील समतोल ढासळत असल्याकडे शास्त्रज्ञ सातत्याने लक्ष वेधत आहेत. मात्र, त्यांचे इशारे अरण्यरुदन ठरत आहेत. सर्वच यंत्रणा त्याकडे सोयीने दुर्लक्ष करीत आहेत. दुर्घटना घडली की खडबडून जागे होऊन घोषणा केल्या जातात. दुर्घटना विस्मरणात गेली की पुन्हा पहिले पाढे पंचावन्न, अशी स्थिती होते. उत्तरकाशी दुर्घटनेनंतर असे होऊ नये, अशी अपेक्षा असली, तरी ती फोल ठरण्याची शक्यता अधिक.

# बदलती शैक्षणिक संस्कृती आणि डॉ.बापूजी साळुंखे यांचे विचार

**दै.हॅलो प्रभात**

अनंत काळ दाटून आलेल्या अज्ञानाचा अंधकार छेदण्यासाठी एक तिमीर नवरूप घेऊन जन्माला आले आणि ज्ञान सूर्याचा प्रकाश घेऊन मानवी अंतकरणा पर्यंत पोहोचले ते ज्ञानयोगी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे. आज ८ ऑगस्ट २०२५ हा बापूजींचा ३८ वा स्मृतिदिन त्यानिमित्ताने...



बापूजींनी महाराष्ट्रात शिल्पित केलेले विशाल सरस्वती मंदिर म्हणजेच मनी - मानसीचे, भूतकाळात कल्पिलेले, वर्तमान काळात उभारलेले दिव्यभव्य स्वप्न होय. म्हणूनच संकल्प सिद्धी ला नेणारे महापुरुष, प्रत्यक्ष सरस्वतीला चालते-बोलते करणारे शारदेचे एक तेजस्वी उपासक म्हणून बापूजींचे जिथे अलौकिक डोळे दिपणारे सौंदर्य दिसते तिथं मस्तक नतमस्तक होतेच. शिक्षण म्हणजे जन्मात कधी पचनी न पडणारे, डोक्यात निरंतर धुडगूस घालणारे आणि आपल्या मेंदूत ठासून कोंबलेले माहितीचे भेंडोळे नव्हे. 'Education is manifestation of erfection all ready in man' शिक्षण म्हणजे मनुष्याच्या ठिकाणी जे पूर्णत्व आधीचेच विद्यमान आहे त्याचे प्रकटीकरण होय. बापूजींनी महाराष्ट्राला शिक्षणाच्या माध्यमातून भक्तियोग, ज्ञानयोग, आणि कर्मयोग दिला. तसेच आदर्श शिक्षणाचे ज्ञान अमृत ही दिले. जन्माला आलेल्या मुलाला काही वर्षांमध्ये शाळेत घालून ज्ञान दिले जाते. थोडक्यात, लहान वयापासूनच मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण केली जाते. शिक्षण असे माध्यम आहे की ज्यामधून आपण आपल्या जीवनामध्ये यशस्वी होऊ शकतो. शिक्षणाची शैली ही आजच्या काळाची नसून प्राचीन काळापासून चालत आली आहे. पूर्वी वेगवेगळ्या प्रकारचे शिक्षण दिले जात होते. सुरुवातीला माणसाला विविध कलेचे शिक्षण दिले जात होते जसे की, धनुर्विद्या. प्राचीन काळच्या शिष्याला हाती समिधा घेऊन गुरूच्या आश्रमात जावे लागे आणि गुरु ही त्याची योग्यता पारखून काया, वाचा आणि मन संयमीत ठेवण्याचे चिन्ह म्हणून गुंजगवताची एक दोरी बांधून विद्या शिकवत असे. परंतु हळु हळू जसजसा काळ बदलत गेला त्याचप्रमाणे शिक्षणामध्ये ही अमुलाग्र बदल झाले.

काही वर्षापूर्वी विद्यार्थ्यांना शिक्षणामधील सर्वात महत्वाचे साधन म्हणजे पाटी आणि पेन्सिल होते त्याच ठिकाणी वही आणि पेन आला परंतु अलीकडच्या काळामध्ये प्रगती होऊन डिजिटल शिक्षण पद्धती आली आहे. नवनवीन संशोधनाच्या जोरावर आजचे जीवन हे अधिकच सोपे व सोयीस्कर झाले आहे आणि या शोधांचा परिणाम हा त्याच्या शिक्षणावर होत चाललेला आहे. त्यामुळे शिक्षण देखील सातत्याने बदलत आहे. आजच्या डिजिटल युगामध्ये शिक्षणाने ही डिजिटल रूप धारण केले आहे. एवढेच नसून आजच्या काळात ऑनलाइन शिक्षणप्रणाली येऊ घातली आहे. या सर्व बदलत्या शिक्षण प्रणालीचे परिणामही पाहायला मिळतात. एक गोष्ट लक्षात येते की, विद्यार्थ्यांना शाळा अथवा महाविद्यालयामध्ये दिले जाणारे शिक्षण एक उत्कृष्ट दर्जा बजावते तर, डिजिटल शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कुचकामी ठरताना दिसत आहे.

असं म्हटलं जातं की देशाची तरुण पिढी ही देशाचे भविष्य असते. परंतु देशाचे भविष्य उज्ज्वल करायचे असेल तर विद्यार्थ्यांना चांगल्या गोष्टीचे शिक्षण देणे गरजेचे आहे. केवळ महाविद्यालयांमध्ये शिकवले जाणारे विषय हे विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल करू शकत नाहीत. त्या सोबत बापूजींनी दिलेल्या ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार याचे धडे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला पोषक आहेत. सर्व गुणांची प्रगती करणारे ज्ञान आज विद्यार्थ्यांना हवे आहे. आजचे शिक्षण हे पूर्ण पुस्तकी स्वरूपाचं आहे. पुस्तकी माहिती ठराविक वेळेत उतरून काढणे म्हणजे परीक्षा होय. यामुळे पुस्तका बाहेरील कुठल्याही गोष्टीचा विचार करण्याची मुभा स्वातंत्र्य विचार करण्याची क्षमता आहे, ती आज विद्यार्थ्यांना मिळत नाही. स्वतःच्या बुद्धीचा वापर करण्याची संधीच मिळत नसल्याने विद्यार्थ्यांची खरी गुणवत्ता कळत नाही. डिग्र्या मिळवणं, स्पर्धा करण, पाठांतर, घोकंपट्टी करुण विविध क्षेत्रात प्रवेश मिळवणं आजच्या शिक्षणाची प्रगती म्हणावी लागेल. आपली काळानुसार बदलती संस्कृती आहे. दिवसेंदिवस बाहेर पडणाऱ्या पदवीधरांची संख्या वाढते परंतु त्यांनी घेतलेल्या शिक्षणाचा दर्जा वेगाने घसरत आहे. आज वाढत्या औद्योगीकरणाच्या परिस्थितीत व्यवसायाभिमुख व प्रात्यक्षिकावर आधारित शिक्षणाची गरज आहे. ती आज पूर्ण होत नसल्याचे दिसून येते. विकास हा उद्देश डोळ्यासमोर ठेवल्यास नृत्य, गायन, शिल्प, कला, खेळ याचा शिक्षणात अंतर्भाव हवा परंतु अजूनही विषयांकडे उपेक्षेने पाहिले जाते.

आजच्या शिक्षण पद्धतीतून मनुष्य सुशिक्षित होतो. परंतु तो सुजान सुसंस्कृत होतोच असे नाही. शिक्षण हा पवित्र संस्कार आहे अशी व्यक्ती सुसंस्कृत हवी पण तसे दिसत नाही. शारीरिक, बौद्धिक, भावनिक असा सर्वकष विकास साधण्यासाठी शिक्षण पद्धतीत अमूलाग्र बदलाची गरज आहे. भाकरी मिळवून देणारे, सुसंस्कार घडविणारे शिक्षण आज मिळाली पाहिजे. बदलती संस्कृती सुसंस्कारित होण्यासाठी आज बापूजींच्या विचारांची गरज आहे. बापूजी म्हणजे 'शिक्षणाचा ध्यास आणि त्यासाठीच श्वास' अशी उदात्त प्रयत्नशीलतेची, कर्तृत्वाची, जिद्दीची ध्येयधुंद गाथाच आहे.

शिक्षणाने समृद्धी वाढली आणि पक्षाप्रमाणे आकाशात विहार करायला शिकलो, माशाप्रमाणे पोहायला शिकलो परंतु अद्याप माणसाप्रमाणे जगायला शिकलो नाही. परस्परातील आदर भाव, समाज प्रेम, राष्ट्रप्रेम, त्याग, नैतिक मूल्य इत्यादी बाबींची समाजात कुठेतरी उणीव भासू लागली. या गोष्टी बदलत्या शैक्षणिक संस्कृती मध्ये कमी पडू लागल्या, मूल्यशिक्षण मिळेनासे झाले, त्याच वेळेला बापूजींच्या विचारमंथनातून राष्ट्रात प्रेरक आणि संवर्धक अशा महामंत्राचा जन्म झाला तो म्हणजे 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' शिक्षणाने विधायक परिवर्तन घडविले पाहिजे. शिक्षण हे परिवर्तनाचे साधन आहे ते जीवनाचे साध्य बनले पाहिजे त्याच्या माध्यमातून नव्या दृष्टीचा, विज्ञान आणि तंत्रज्ञान जाणारा, समाज व देश हिताने भारावलेला सुसंस्कृत विचारांचा मानव घडला पाहिजे या उदात्त हेतूने बापूजींनी काही निवडक सहकाऱ्यांच्या मदतीने कराड येथील प्रीती संगमावरील मुरलीधराच्या गाभाऱ्यात शैक्षणिक क्रांतीचा संकल्प केला आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा जन्म झाला.

'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' हे राष्ट्र उद्धारक बोधवाक्य बापूजींनी संस्थेस दिले. शिक्षणाचा हेतूच बापूजींनी या महामंत्रातून सांगितला. जेणेकरून शिक्षणाने निर्माण झालेल्या व्यथा कमी होतील, विद्यार्थी हा समाजप्रिय, राष्ट्र उपासक, त्यागी आणि उच्च प्रज्ञेचा राहील असे उद्दिष्ट बापूजींनी दिले. केवळ ज्ञान आणि विज्ञान यांनीच समाज सुख-समृद्धी कडे जाणार नाही तर त्याला सू -संस्काराची जोड असावी लागते हे बापूजींनी शिक्षण विचारातून सांगितले आहे. तसेच बापूजींनी संस्थेच्या शैक्षणिक तत्वज्ञानात सत्य, शील, प्रामाणिकता, त्याग आणि पिळवणूकिस आळा ही मानवी जीवनाची मूल्य घेतली आहेत. ज्याद्वारे त्यांनी सामान्य माणसाच्या जीवनात क्रांती घडविली. बापूजींनी ही मुल्ये आग्रहपूर्वक व निष्ठेने कृतीत आणली. त्यांच्या अंगी प्रामाणिकपणा होता म्हणूनच ते सांगतात की सत्य,शील, प्रामाणिकपणा, पिळवणुकीस आळा , त्याग आणि सेवा यांचे ज्ञान करून घ्यायचे व त्यांचे आचरण करावयाचे म्हणजे विज्ञान हेच खरे शिक्षणाचे उद्दिष्ट होय. बापूजींचे हे सुसंस्कार आहेत ते आजच्या ऑनलाईन शिक्षण प्रणाली मध्ये कुठेच मिळवता येत नाहीत हे सुसंस्कार बापूजीनीं समाजासाठी निर्माण केलेले आहेत. कारण बापूजींना माहित होते ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्काराणे घडलेले विद्यार्थी खऱ्या अर्थाने देश घडवू शकतील. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर बापूजी शिक्षण क्षेत्रात आले होते. कारण लोकांना शिक्षण मिळाले नाही तर मिळालेले स्वातंत्र्य धोक्यात येईल स्वराज्याचे रामराज्य होणार नाही म्हणून बापूजी म्हणतात 'देशाला मिळालेले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी स्वाभिमानी, कर्तव्यदक्ष, सुदृढ व निरोगी मनाची भावी पिढी हवी आहे, कारण देशातील कोट्यावधी लोक निरक्षर असून अज्ञान अंधकारात चाचपडत आहेत त्या सर्वांना सुशिक्षित व सुसंस्कारीत बनवण्यासाठी मला आजन्म शिक्षकच राहिले पाहिजे.' यामागे त्यांची निश्चित अशी विचारधारा होती. शिक्षणाने माणसातला माणूस बापूजींनी जागा केला. सुसंस्कारी मनुष्य हा परमेश्वराचा अविष्कार आहे आणि तो प्रकट करून देणे हे शिक्षणाचे काम आहे असे बापूजी म्हणायचे. शिक्षणाने माणूस केवळ सुशिक्षित बनता कामा नये तर तो सूसंस्कृत झाला पाहिजे, समाज हित व देशहित जाणारा असला पाहिजे तरच खऱ्या अर्थाने शिक्षणाचा जीवनात उपयोग होईल.

शिक्षक नव्हे गुरुदेव, शाळा नव्हे संस्कार केंद्रे, शिक्षण हे पवित्र आहे ते पावित्र्याने दिले व घेतले पाहिजे बापूजींचे विचारधन महत्त्वाचे आहेत. सद्वर्तनी, सुसंस्कारी, व शील संपन्न समाज निर्माण करायचा असेल तर शिक्षणाची कास पकडावी लागेल. बापूजींच्या शैक्षणिक विचारांच्या माध्यमातूनच देशहितासाठी सुजाण व सुसंस्कारी नागरिक तयार झाला पाहिजे. प्रत्येकाने मन, मेंदू, मनगट यांचा योग्य उपयोग करून स्वतःचे जीवन सुधारले पाहिजे असे ठाम मत बापूजींचे होते. बापूजी हे समाज हिताचे व विद्यार्थी हिताचे भान बाळगणारे शिक्षणमहर्षी होते. त्यांचे शैक्षणिक विचार आजच्या व भावी पिढीसाठी नक्कीच मार्गदर्शक ठरतील. समाजातील सर्व भेदभाव संपवून सामाजिक बांधिलकी व राष्ट्रप्रेम गुरुदेव कार्यकर्त्यांच्या मनात पेरण्याचे खरे कार्य बापूजींनी केले. ज्योत प्रज्वलित होण्यासाठी ठिणगीची आवश्यकता असते. ठिणगी पडताच धगधगते, स्वयम प्रकाशित होते. स्वतः जळून दुसऱ्याला जगविण्याचे, प्रकाशित करण्याचे कार्य बापूजींनी केले. शुद्ध आचार विचारांच्या समृद्ध पायाभरणी वर परमपूज्य बापुजी रुपी सुंदर सुसंस्कारी जीवनपुष्प उमलत गेले आणि आयुष्याच्या अखेरपर्यंत सुगंध देत सदैव दरवळतच राहिले. ज्ञानाच्या या अथांग सागरास माझे कोटी कोटी प्रणाम!

• प्रा.डॉ.स्वाती चव्हाण
भूगोल विभाग
आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज,कडेपूर



## रिलायंसकडून सरकारी तिजोरीत २.१० लाख कोटींची भर

**पुणे : हॅलो प्रभात**




देशाचे आघाडीचे उद्योजक मुकेश अंबानी यांच्या रिलायंस इंडस्ट्रीज लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये विविध प्रकारचे कर, लेवी, स्पेक्ट्रम शुल्क आणि अन्य बाबींतून केंद्र सरकारच्या तिजोरीत एकूण २,१०,२६९ कोटी रुपये जमा केले आहेत. ही रक्कम मागील वर्षाच्या १,८६,४४० कोटी रुपयांपेक्षा १२.८% ने अधिक आहे. हे पहिल्यांदाच घडले आहे की रिलायंसने राष्ट्रीय तिजोरीत २ लाख कोटींपेक्षा अधिक योगदान दिले आहे.

त्यासोबतच, वित्तीय वर्ष २०२० ते २०२५ या सहा वर्षांत रिलायंसने एकूण १० लाख कोटींपेक्षा जास्त रक्कम सरकारकडे जमा केली आहे. लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे, देशाच्या तिजोरीत सर्वाधिक योगदान देणारी कंपनी म्हणजे रिलायंस आहे. रिलायंस इंडस्ट्रीजच्या वार्षिक अहवालात कंपनीने मागील १० वर्षांचे आर्थिक प्रदर्शनही मांडले आहे. या अहवालानुसार, कंपनीने आपल्या शेअरधारकांना ५ पट अधिक मूल्य दिले आहे. कंपनीचे बाजार भांडवल मागील १० वर्षांत ५ पट वाढून आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये १७,२५,३७८ कोटी रुपये झाले आहे, जे यापूर्वी ३३८,७०३ कोटी रुपये होते. कंपनीच्या एकत्रित महसुलातही ३.६५ पट वाढ झाली असून, वार्षिक निव्वळ नफा वित्त वर्ष २०१५-१६ मधील २९,८६१ कोटी रुपयांवरून २.७२ पट वाढून ८१,३०९ कोटी रुपये झाला आहे.

## रक्षाबंधनाकरिता पेटीएमचे गिफ्टिंग पर्याय

**मुंबई : हॅलो प्रभात**




विश्वास आणि प्रेमाच्या नात्याचा सन्मान करत पारंपरिक भेटवस्तूंपलीकडे जात या रक्षाबंधनाला दीर्घकालीन मूल्य देणा-या भेटवस्तूंनी भावा-बहिणेचे प्रेमळ नाते साजरे करा. भारतातील आघाडीची पेमेंट्स आणि वित्तीय सेवा वितरक कंपनी पेटीएम बहिणींना आर्थिक सुरक्षा, संस्मरणीय अनुभव आणि दीर्घकालीन फायदे देणारे विविध पर्याय सादर करत आहे. यात वैयक्तिक संदेशासह यूपीआय ट्रान्सफर, गिफ्ट कार्ड्स, डिजिटल गोल्ड, प्रवासाची तिकीट बुक करा किंवा ट्रॅव्हल पास भेट, स्टेकॅशन किंवा व्हेकेशन भेट आणि आरोग्य विमा यांचा समावेश आहे.

## ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल्समध्ये क्रिएटिव्ह लर्निंग प्रोग्रॅम लाँच

**पुणे : हॅलो प्रभात**



सर्जनशीलतेचे शिक्षण आणि व्हिज्युअल स्टोरीटेलिंग क्षेत्रात क्रांती आणण्यासाठी ग्लोबल स्कूल्स ग्रुप (जीएसजी) यांनी ग्लोबल स्कूल्स - निकॉन स्कूल ऑफ क्रिएटिव्हिटीचा विस्तार करणार असल्याची घोषणा केली आहे. फेब्रुवारी २०२५ मध्ये जीआयएस नागपूरच्या यशस्वी लाँचनंतर भारतात तीन ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल (जीआयआयएस) कॅम्पस सुरू केले जाणार असून त्यात पुणे, नॉयडा, अहमदाबाद यांचा समावेश आहे. 'हा क्रांतीकारी उपक्रम जीआयआयएस आणि निकॉन इंडिया या जागतिक स्तरावर इमेजिंग आणि ऑप्टिक्स क्षेत्रात आघाडीवर असलेली कंपनी यांच्यात झालेला अशा प्रकारचा पहिलाच उपक्रम आहे. निकॉनने शाळेबरोबर केलेली ही पहिलीच भागिदारी आहे,' असे ग्लोबल स्कूल्स ग्रुपचे सीओओ राजीव कौल म्हणाले. या प्रोग्रॅमद्वारे जगभरातील विद्यार्थ्यांना अत्याधुनिक फोटोग्राफीचे प्रशिक्षण देत क्रिएटिव्ह अभिव्यक्ती व डिजिटल साक्षरतेला चालना देत आहे. या बदलातून २१ व्या शतकासाठी आवश्यक कौशल्यांचा विकास करण्याची आमची बांधिलकी दिसून येते.

## ब्लूस्टोन ज्वेलरीचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव ११ ऑगस्ट रोजी उघडणार

**मुंबई : हॅलो प्रभात**

ब्लूस्टोन ज्वेलरी अँड लाइफस्टाइल लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरसाठी रु. १ दर्शनी मूल्याच्या प्रत्येक इक्विटी शेअरसाठी किंमतपट्टा ४९२ रु. ते ५१७ रु. असा निश्चित केला आहे. कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक ऑफर (आयपीओ किंवा ऑफर) सोमवार, ११ ऑगस्ट २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि बुधवार, १३ ऑगस्ट २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान २९ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर २९ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात. लूस्टोन ज्वेलरी अँड लाइफस्टाइल लिमिटेड त्यांच्या प्रमुख ब्रँड, ब्लूस्टोन अंतर्गत समकालीन जीवनशैली हिरे, सोने, प्लॅटिनम आणि स्टडेड दागिने ऑफर करते. ब्लूस्टोन ब्रँड २०११ मध्ये लाँच करण्यात आला आणि गेल्या काही वर्षांत तो आघाडीच्या ज्वेलरी रिटेलर्समध्ये एक आघाडीचा ब्रँड बनला आहे. हा एक डिजिटल फर्स्ट डायरेक्ट-टू-कंझ्युमर (डी टू सी) ब्रँड आहे जो ग्राहकांना एकसंध ओम्नीचॅनेल अनुभव सुनिश्चित करण्यावर लक्ष केंद्रित करतो आणि आर्थिक वर्ष २०२४ मध्ये उत्पन्नाच्या बाबतीत भारतातील दुसरा सर्वात मोठा डिजिटल-फर्स्ट ओम्नी-चॅनेल ज्वेलरी ब्रँड आहे.

## दहशतवादावर डोसियर नाही थेट क्षेपणास्त्र पाठवतो : अमित शाह

**मुंबई : हॅलो प्रभात**



भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते अमित शाह यांनी अलीकडेच दिलेल्या मुद्देसूद भाषणातून हे स्पष्ट केलं की भारताची सध्याची राष्ट्रीय सुरक्षाव्यवस्था विरोधकांच्या चुकांवर कशी योग्य तोडगा काढत आहे. काँग्रेसच्या राजकारणामुळे देशाला जे जखमांचे दु:ख भोगावे लागले, ते आजही पाकिस्तान समर्थनाने चालणाऱ्या दहशतवादाच्या रूपात दिसून येते. पंडित नेहरूंच्या ऐतिहासिक चुकांमुळेच पीओके (पाकव्याप्त काश्मीर) तयार झाला आणि त्याच काळात भारताचे ३८,००० चौरस किलोमीटर क्षेत्र चीनच्या ताब्यात गेले.१९७१ मधील विजयानंतरही, काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकारने १५,००० चौरस किलोमीटर भूमी व पीओके ताब्यात घेण्याची संधी गमावली. उलट, त्यांनी पाकिस्तानच्या ९३,००० युद्धकैद्यांना सोडून इतिहासातील सर्वात मोठी रणनीतिक चूक केली. बाटला हाऊस एन्काउंटरमध्ये मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांवर अश्रू ढाळले, पण शहीद मोहन चंद्र शर्मांसाठी संवेदनाही व्यक्त केली नाही ही काँग्रेसच्या मानसिकतेची खरी ओळख आहे.

## ऑडीद्वारे ग्राहकांसाठी नव्या योजनांची घोषणा

**मुंबई : हॅलो प्रभात**



ऑडी या जर्मन लक्झरी कार उत्पादक कंपनीने आज त्यांच्या सर्वसमावेशक वॉरंटी आणि ऑडी रोडसाइड असिस्टन्स प्रोग्रामची घोषणा केली, जेथे ग्राहकांना त्यांच्या संपूर्ण उत्पादन पोर्टफोलिओमध्ये उद्योग-अग्रणी १०-वर्ष विस्तारित वॉरंटी आणि १५-वर्ष रोडसाइड असिस्टन्स सेवा देण्यात येत आहे. नवीन विस्तारित वॉरंटी प्रोग्राम ग्राहकांना वेईकलच्या उत्पादन तारखेपासून जवळपास १० वर्षांपर्यंत सर्वसमावेशक कव्हरेज देतो. विस्तारित वॉरंटी मूल्यवर्धित पर्याय म्हणून उपलब्ध आहे, जो ग्राहकांना अपवादात्मक अनुभव देण्याप्रती आणि भारतातील लक्झरी ऑटोमोटिव्ह विभागाला प्रगत करण्याप्रती ऑडीची सातत्यपूर्ण कटिबद्धता अधिक दृढ करतो.

## हिमालया बेबीकेअरची हर कदम हर माँ के साथ मोहीम



**मुंबई : हॅलो प्रभात**

भारतातील नंबर १ डॉक्टरांनी सुचवलेला बेबी केअर ब्रँड, हिमालया बेबीकेअरने, जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त एक हृदयस्पर्शी व्हिडिओ सादर केला आहे. 'हर कदम हर मा ँके साथ' ही मोहीम आईना सार्वजनिक ठिकाणी स्तनपान करताना भेडसावणाऱ्या अडचणींवर लक्ष केंद्रित करते - जसे की खासगीपणाचा अभाव असणे आणि सुरक्षित वातावरण नसणे. आईचा आराम आणि आत्मविश्वास फक्त घरापुरताच मर्यादित नसावा, या विचारातून प्रेरित होऊन हिमालया बेबीकेअर भारतभरातील लाखो आईचा अनुभव बदलण्याचा प्रयत्न करत आहे.

## टोयोटा इनोव्हाने भारतात २० गौरवशाली वर्षे केली पूर्ण

**मुंबई : हॅलो प्रभात**




भारतातील आपल्या प्रवासामध्ये अभिमानास्पद टप्पा गाठत टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज टोयोटा इनोव्हाची २० उल्लेखनीय वर्षे साजरी केली. ही कार लाखो भारतीय कुटुंबं व व्यवसायांसाठी विश्वसनीय सोबती ठरली आहे. इनोव्हा, इनोव्हा क्रिस्टा आणि इनोव्हा हायक्रॉस या तीन ऑफरिंग्जमध्ये १२ लाखांहून अधिक युनिट्सची विक्री करण्यासह ब्रँड अविरत ग्राहक विश्वास आणि दीर्घकालीन मूल्याचे प्रतीक आहे. गेल्या दोन दशकांमध्ये इनोव्हा भारतातील ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी सतत विकसित झाली आहे, तसेच 'क्वॉलिटी, ड्यूरेबिलिटी अँड रिलायबिलिटी' या टोयोटाच्या मुलभूत तत्त्वामध्ये सामावलेली आहे. हा फक्त आकडेवारीचा महत्त्वपूर्ण टप्पा नाही, तर आव्हानात्मक काळात देखील उत्तम कामगिरी केलेल्या इनोव्हामुळे शक्य झालेले अनेक प्रवास, आठवणी आणि क्षणांचे साजरीकरण आहे.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय** : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क** : ९०२१६५१९७६ ■ **कोल्हापूर कार्यालय** : एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर

हॅलो प्रभात
# कोल्हापूर
जिल्हा विशेष ■ शुक्रवार, ०८ऑगस्ट २०२५





## ● संमिश्र ●

# आता मराठवाड्यात 'गोकुळ'ची उत्पादने उपलब्ध होणार : नविद मुश्रीफ

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित (गोकुळ) चे चेअरमन नविद मुश्रीफ आणि संचालक मंडळाने मराठवाड्यातील उजना मिल्क प्रॉडक्ट्स प्रा. लि., सुनेगाव (सांगवी), ता. अहमदपूर, जि. लातूर या डेअरीला बुधवार, दि. ६ ऑगस्ट २०२५ रोजी सदिच्छा भेट दिली.या भेटीदरम्यान अहमदपूरचे माजी आमदार बाळासाहेब जाधव आणि अविनाश जाधव यांनी चेअरमन नविद मुश्रीफ आणि गोकुळ संचालक मंडळाचे स्वागत करून सत्कार केला.यावेळी बोलताना चेअरमन नविद मुश्रीफ म्हणाले, मुंबई, पुणे परिसरासह आता मराठवाडा विभागातूनही 'गोकुळ'च्या दूध व दुग्धजन्य पदार्थांना वाढती मागणी आहे. त्यामुळे गोकुळ संघाने लातूर व नांदेड परिसरात विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे.

### लातूर व नांदेड परिसरात 'गोकुळ'चा विस्तार



उजना मिल्क या स्थानिक दूध संघाच्या माध्यमातून गोकुळचे उत्पादने ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचा मानस असून, सहकार मंत्री व उजना मिल्कचे चेअरमन नामदार बाबासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सकारात्मक चर्चा झाली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. लवकरच मराठवाड्यात गोकुळच्या दर्जेदार उत्पादनांचा पुरवठा सुरू होणार आहे. या भेटीत श्री. मुश्रीफ यांनी डेअरीतील विविध यंत्रणा, कार्यपद्धती आणि तांत्रिक सुविधा यांची सविस्तर पाहणी केली. डेअरी व्यवस्थापक संदीप पाटील यांनी दूध संकलन प्रक्रियेची सखोल माहिती दिली.यावेळी चेअरमन नविद मुश्रीफ, माजी आमदार बाळासाहेब जाधव,युवराज पाटील, शशिकांत पाटील-चुयेकर, संचालक प्रा.किसन चौगले, बिद्री कारखान्याचे उपाध्यक्ष मनोज फराकटे, डेअरी व्यवस्थापक अविनाश जाधव, सुरज पाटील, अनिल चौधरी, वरिष्ठ दूध संकलन अधिकारी सर्जेराव पाटील, मार्केटिंग अधिकारी शिवाजी चौगले उपस्थित होते.

## डॉ.शबाना मोकाशी यांची सावर्डे केंद्र शाळेस भेट



**पेठवडगाव : हॅलो प्रभात**

हातकणंगले तालुक्याच्या गटविकास अधिकारी डॉ.शबाना मोकाशी यांनी केंद्रीय प्राथमिक शाळा सावर्डे येथे भेट दिली. शालेय परिसर, शाळेतील भौतिक सुविधा, संगणक कक्ष ,ई लर्निंग सुविधा, स्मार्ट टीव्ही तसेच प्रोजेक्टर सुविधा पाहून त्यांनी शाळेचे कौतुक केले. शाळेच्या सुसज्ज हॉल सुविधा बद्दल समाधान व्यक्त केले. शाळेत नवीनच बसवलेल्या जक्झ थिएटरचे उद्घाटन मोकाशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सोबत पंचायत समिती हातकणंगलेचे विस्तार अधिकारी अजय बिरणगे, भूपाल मंडगे, पारगाव केंद्राचे केंद्रप्रमुख श्री.मावची तसेच सावर्डे केंद्राचे केंद्रप्रमुख पोपट पाटील व आदर्श शिक्षक आर.बी.पाटील तसेच शाळेतील सर्व अध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.शेवटी शाळेचे मुख्याध्यापक अनिल चव्हाण यांनी सर्वांचे आभार मानले.

## महसूल विभागातर्फे आजी-माजी सैनिक अदालत




**गारगोटी : हॅलो प्रभात**

मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियानांतर्गत महसूल विभागामार्फत भुदरगड तालुक्यात सैनिक अदालत आयोजित करण्यात आली होती. उपविभागीय अधिकारी हरेष सुळ अध्यक्षस्थानी होते. भुदरगड तालुक्यातील सर्व आजी-माजी सैनिकांच्या समस्यांची सोडवणूक करणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमास तालुक्यातील सर्व शासकीय यंत्रणांचे अधिकारी, प्रतिनिधी, कर्मचारी तसेच आजी-माजी सैनिक मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी माजी सैनिकांनी विविध समस्या जाहीरपणे मांडल्या. प्रांताधिकारी हरेष सुळ यांनी त्यांच्याकडून सर्व प्रश्नांबाबत माहिती घेऊन चर्चा केली. यानंतर सर्व शासकीय यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना तत्काळ समस्यांचे निराकरण करण्याच्या सूचना केल्या.यावेळी भुदरगड तालुका माजी सैनिक संघटना अध्यक्ष सर्जेराव मेंगाणे, माजी सैनिक पतसंस्था चेअरमन नारायण देसाई, जिल्हा सैनिक कार्यालयाचे प्रतिनिधी सुहास कांबळे, नामदेव पाटील, भूमिअभिलेखचे उपअधीक्षक विनायक कुलकर्णी आदी उपस्थित होते. महसूल सहायक प्रकाश वडगावकर यांनी सूत्रसंचालन केले.

## शहरात दोन गटात जोरदार हाणामारी

**हुपरी : हॅलो प्रभात**

येथील जवाहर कारखाना शेजारी महावीर गार्डन जवळ दोन गटात जोरदार मारामारी. हुपरी येथील हॉटेल शिवनेरीचे मालक कुमार कदम व स्टार वडापाव सेंटरचे मालक धनाजी पाटील यांच्या मध्ये अनेक दिवस पासून सुरू असलेल्या वादआज पुन्हा उफाळून आला. या वादामध्ये काही बाहेरील लोकांनी तोंडाला रुमाल बांधून आल्याने जोरदार मारामारी झाली. यामध्ये काहीजण जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी प्राथमिक केंद्र हॉस्पिटल येथे नेण्यात आले. तोंडाला रुमाल बांधून आलेले लोक हे सुपारी देऊन आणली असावीत अशी चर्चा घटनास्थळावर होत होती. या सर्व प्रकरणाबाबत हॉटेलचे सी सी टी व्ही फुटेज तपासुन हुपरी पोलीस स्टेशन येथे रात्री उशीरा गुन्हा नोंद झाला असून या गुन्ह्यामध्ये एकूण आठ ते नऊ जणांवर परस्पर गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. पुढील तपास सपोनी कोळपे करीत आहेत.

## रीगल रिसोर्सेसची प्रारंभिक ऑफर मंगळवारी उघडणार

**मुंबई : हॅलो प्रभात**

रीगल रिसोर्सेस लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरसाठी ५ रु. प्रत्येक दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअरसाठी ९६ रु. ते १०२ रु. किंमतपट्टा निश्चित केला आहे. कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव (आयपीओ किंवा ऑफर) मंगळवार, १२ ऑगस्ट रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि गुरुवार, १४ ऑगस्ट रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान १४४ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर १४४ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.

## 'खालिद का शिवाजी' चित्रपटावर बंदी घाला

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

'खालिद का शिवाजी' या आगामी मराठी चित्रपटामध्ये महाराजांविषयी ऐतिहासिकदृष्ट्या खोटी, तथ्यहीन व विकृत माहिती देऊन समस्त जनतेची दिशाभूल केली आहे. या विकृत प्रचारामुळे समस्त शिवप्रेमींच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत. या चित्रपटावर बंदी घालण्यात यावी, अशी मागणीचे निवेदन हिंदु जनजागृती समिती आणि सकल हिंदू समाज यांच्या वतीने कोल्हापूर निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली यांना देण्यात आले.

# महादेवीला परत आणण्याच्या हालचालींना गती

### खासदार धैर्यशील मानेंच्या प्रयत्नांना यश

**रुकडी : हॅलो प्रभात**

नांदणी (ता. शिरोळ) येथील जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी संस्थान मठाची महादेवी ऊर्फ माधुरी हत्तीण परत आणण्यासाठी केंद्र व राज्य शासन स्तरावर हालचालींना गती मिळाली असून, या पार्श्वभूमीवर दिल्ली येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली उच्चस्तरीय बैठक पार पडली.या बैठकीत शिवसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे,खासदार धैर्यशील माने उपस्थित होते. दरम्यान ,या बैठकीत महादेवी हत्तीण परत आणण्यासाठी तातडीने आवश्यक ती



पावले उचलण्याचे स्पष्ट निर्देश गृहमंत्री अमित शहा यांनी संबंधित यंत्रणांना दिले.त्यामुळे खासदार धैर्यशील माने यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे. दरम्यान,या पार्श्वभूमीवर कोल्हापुरात वनतारा संस्थेच्या सीईओंना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून, खासदार माने यांच्या पुढाकाराने बैठक घेण्यात आली होती.या चर्चे नंतर वनतारानेही सकारात्मक भूमिका घेतली. या बैठकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई येथे ( दि.५ ) रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक पार पडली या बैठकीमध्ये खासदार धैर्यशील माने यांनी सुप्रीम कोर्टात महाराष्ट्र शासनासोबत पुनरावलोकन याचिकेत स्वतः वनताराने मठाच्या बाजूने पक्षकार व्हावे अशी मागणी केली होती.या मागणीलाही सकारात्मक प्रतिसाद देत वनताराने पक्षकार होण्यास संमती दर्शविली आहे.तसेच नांदणी मठामध्ये हत्तीणीच्या संगोपनासाठी आवश्यक ती सुरक्षायंत्रणा उभारण्याने व वैद्यकिय सेवा देण्याचा निर्णयही वनताराने घेतल्याची माहिती खासदार माने यांनी दिली. बैठकीस खा.नरेश मस्के,खा. मिलिंद देवरा, खा.संदिपान भुमरे, खा.श्रीरंग आप्पा बारणे,खा. रवींद्र वायकर उपस्थित होते.

## डी.सी.ई.वरिष्ठ महाविद्यालयात मेंहदी-राखी वर कार्यशाळा संपन्न




**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

डी.सी.ई. वरिष्ठ महाविद्यालय, करंजफेण येथे सांस्कृतिक विभागाच्या वतीने मेंहदी व राखी तयार करण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यशाळेचे आयोजन सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख प्रा. सौ. एस.एस. गवळी मॅडम यांनी केले होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य पी.डी. पाटील होते. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते म्हणाले, व्यक्तिमत्त्व विकासासाठी अशा कार्यशाळा उपयुक्त ठरतात. विद्यार्थ्यांनी स्वतः च्या पायावर उभे राहण्यासाठी या कौशल्यांचा उपयोग करून घ्यावा. कार्यशाळेच्या प्रमुख वक्त्या कु. राजनंदिनी भोई यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मेंहदी व राखी तयार करण्याचे प्रात्यक्षिकासहित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एस. ए. पाटील सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. जे. एम. कांबळे यांनी केले. कार्यक्रमाला प्रा.एस. एच.पोवार, प्रा.आर.टी.राऊत, सौ.डी.एस. बोळावे, प्रा.सौ. नीता पाटील यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# अर्जुनवाडमध्ये १५ ऑगस्ट दिवशी आमरण उपोषण

**अर्जुनवाड : हॅलो प्रभात**

अर्जुनवाड (ता. शिरोळ) येथील सामाजिक कार्यकर्ते रमेश झांबरे यांनी सण १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२५ या तीन वर्षाच्या कालावधीत कोणकोणते विकास कामे मंजूर होऊन व त्यांना लागणारा फ़ंड व खर्च झालेली रक्कम यांचा पूर्ण तपशील १५ जुलै २०२५ रोजी ग्रामपंचायत कार्यालय अर्जुनवाड यांना यांची पूर्ण माहिती द्यावी यासाठी अर्ज करण्यात आला होता मात्र ७ ऑगस्ट २०२५ रोजी पर्यत अर्जाचा कोणताही ग्रामपंचायत प्रशासन यांनी दखल घेतली नसल्याने ११



ऑगस्ट २०२५ रोजी पर्यत जर दाखल केलेल्या अर्जाचा विचार न केल्यास १५ ऑगस्ट २०२५ रोजी आमरण उपोषण करण्याचा इशारा यावेळी रमेश झांबरे यांनी ग्रामपंचायत प्रशासनास दिला आहे. झांबरे यांच्या आंदोलनाला शिरोळ तालुक्यातील वेगवेगळ्या सामाजिक संघटना पाठिंबा देण्याच्या तयारीत असल्याचे दिसून येत आहे . गावात झालेल्या विकास कामाकडे व स्थानिक समस्यांकडे ग्रामपंचायत प्रशासन, पंचायत समिती शिरोळ, जिल्हा परिषद कोल्हापूर, त्यांचे वारंवार दुर्लक्ष करत असल्यामुळे नागरिकांच्यातून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मागण्या वेळोवेळी प्रशासनाकडे सादर करूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्यामुळे प्रशासनाकडून सतत कामांच्या पारदर्शकतेवर जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलं आहे. आमरण उपोषणाचा इशारा दिलेच्या या पार्श्वभूमीवर परिसरात वातावरण तापले असून नागरिकांत अस्वस्थता आहे. आता प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सदर आमरण उपोषणाचा अर्ज जिल्हाधिकारी कोल्हापूर, तहसीलदार सो शिरोळ, गटविकास अधिकारी शिरोळ, शिरोळ पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन शिरोळ, ग्रामपंचायत प्रशासन यांना सादर करण्यात आले आहे

## ना.उदय सामंत यांची श्रीक्षेत्र नृसिंहवाडीला सदिच्छा भेट



**नृसिंहवाडी : हॅलो प्रभात**

राज्याचे उद्योग मंत्री व शिवसेना नेते ना उदय सामंत यांनी श्रीक्षेत्र नृसिंहवाडीला सदिच्छा भेट दिली. सायंकाळी ना उदय सामंत यांचा गाडीचा ताफा येथील मंदिर मार्गावर दाखल झाला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख रवींद्र माने., उपजिल्हाप्रमुख सतीश मलमे, तालुकाप्रमुख राकेश खोद्रे, युवा सेनेचे प्रवीण दळवी यांनी त्यांचे शाल पुष्पगुच्छ व फटाक्यांच्या आकाशबाजीत .'आवाज कुणाचा शिवसेनेचा' अशा घोषणा देत स्वागत केले. यानंतर मंत्री सामंत यांनी श्री दत्त दर्शन घेऊन शिवसेनेच्या उन्नतीसाठी श्री चरणी प्रार्थना केली.

मंत्री सामंत यांनी दत्त देवस्थान कार्यालयाला भेट दिली यावेळी दत्त देव संस्थान अध्यक्ष व विश्वस्त यांच्याशी मंदिर परिसर विकास तसेच आगामी कन्यागत महापर्वकाळ याबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी दत्त देव संस्थांचे अध्यक्ष वैभव काळू पुजारी, विश्वस्त संजय पुजारी यांनी त्यांचे शाल दत्त प्रतिमा प्रसाद भेट देऊन स्वागत केले. यावेळी विश्वस्त संतोष खोंबारे पुजारी तसेच गुरुप्रसाद पुजारी, अभिजीत जगदाळे,प्रवीण अनुजे, सोमेश गवळी, अमर नलावडे आदी पदाधिकाऱ्यांसह शिवसैनिक उपस्थित होते.

# 'विवेकानंद' मध्ये परदेशातील उच्च शिक्षण संधी विषयावर वेबिनार

**कोल्हापर : हॅलो प्रभात**

विवेकानंद महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने परदेशातील उच्च शिक्षण संधी या विषयावर वेबिनारचे आयोजन करण्यात आले. या वेबिनारमध्ये प्रमुख वक्त्या म्हणून चिव्हर्स केडेमीच्या संस्थापिका श्रीमती पल्लवी देसाई यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वेबिनारमध्ये परदेशातील उच्च शिक्षण घेण्यासाठी लागणारी तयारी, प्रवेश प्रक्रिया, अभ्यासक्रम, शिष्यवृत्ती योजना, व्हिसा व निवासव्यवस्था याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच, इंग्रजी प्राविण्य चाचण्या कशा प्रकारे पार कराव्यात याबाबत ही मार्गदर्शन करण्यात आले. श्रीमती देसाई यांनी विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेताना येणाऱ्या संधी, करिअरच्या दृष्टीने फायदे तसेच सांस्कृतिक अनुभव याविषयी माहिती दिली. सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध शंकांचे निरसन करून आवश्यक सल्ला घेतला. अध्यक्षीय मनोगतात मा. प्राचार्य डॉ.आर. आर. कुंभार यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात या संधीचा फायदा घेऊन विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता वाढवावी, असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमास अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षच्या समन्व्यक डॉ. श्रुती जोशी, रजिस्ट्रार श्री. एस. के. धनवडे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. प्रमुख वक्त्यांची ओळख वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांनी करून दिली. आभार डॉ.ए.आर.कासारकर यांनी मानले. सदर वेबिनार मध्ये महाविद्यालयातील शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सूत्रसंचालन वनस्पतीशास्त्र विभागातील डॉ. प्रिया पाटील व डॉ. स्नेहल वाडकर यांनी केले.

# अधिष्ठान समोर ठेवून कार्य केल्यास अहंकार येत नाही

### ह.भ.प. पांडुरंग गांजवे यांचे प्रतिपादन

**कोतोली : हॅलो प्रभात**

श्रीपतराव चौगुले आर्ट्स अँड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि ज्युनिअर विभागाच्या वतीने श्रावण महिन्यानिमित्त आयोजित 'ज्ञानगंगा : जागर संस्कृतीचा' या व्याख्यानमालेतील दुसऱ्या पुष्पात 'भारतीय संस्कृती आणि रामायणातील आदर्श या विषयावर ह.भ.प. पांडुरंग गांजवे यांनी अभ्यासपूर्ण आणि प्रेरणादायी मार्गदर्शन केले.यावेळी व्याख्यान देताना ते म्हणाले, अधिष्ठान समोर ठेवून कार्य केल्यास अहंकार किंवा गर्व येत नाही. जीवनातील सुख-दुःख यासाठी आपली स्वतःची कर्म कारणीभूत असतात. ईश्वराने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत राहिले पाहिजे. ते पुढे म्हणाले, ध्यान हे ज्ञानापेक्षाही श्रेष्ठ आहे. गुरूचा बोध झाल्याशिवाय ज्ञानाचा योग्य उपयोग होत नाही. रामायण हे जगातील पहिले महाकाव्य असून त्यातील तत्वज्ञान आजही



तितकेच उपयुक्त आहे. प्रभू श्रीराम हे मर्यादा पुरुषोत्तम म्हणून ओळखले जातात. त्यांनी असुरी शक्तीचा नाश करून धर्माचे रक्षण केले आणि मिळालेल्या विद्येचा समाजाच्या हितासाठी वापर केला. विद्यार्थ्यांनी संत महात्म्यांचे चरित्र वाचून त्यातून जीवनमूल्ये शिकावीत.

चूक नसतानाही क्षमायाचना करण्याचा संस्कार अंगी बाणवावा, असेही त्यांनी अधोरेखित केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव शिवाजीराव पाटील, माजी प्राचार्य डॉ. जे. के. पवार, पत्रकार विक्रम पाटील, शिवाजी विद्यापीठाच्या सभा सदस्या व ज्युनिअर विभाग प्रमुख डॉ. उषा पवार, तसेच डॉ. बी. एन. रावण (अं. गु. ह. कक्ष समन्वयक), डॉ. एस. एस. कुरलीकर (सहसमन्वयक), मुख्याध्यापिका टी. के. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ.उषा पवार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रवींद्र चौगुले यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. प्रतिभा पाटील यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व प्रशासनिक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘शरद’ सूतगिरणीची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध

## २१ संचालकांची बिनविरोध निवड ■ ना.आबिटकरांनी दिली जेष्ठ, कट्टर कार्यकर्त्यांना संधी

**गारगोटी : धनाजी आरडे**

आकुर्डे (ता.भुदरगड) येथील शरद सहकारी सूतगिरणीची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून वस्त्रोद्योग विभाग सोलापूरच्या प्रादेशिक उपआयुक्त उज्वला पळसकर यांनी काम पाहिले. या निवडणुकीत एकूण आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी २१ नवीन चेहऱ्यांना संचालकपदाची संधी दिली आहे. तर या मध्यमातून राधानगरी विधानसभा मतदारसंघात आबिटकर गटाने सहकारी संस्था उभारणीत दमदार एन्ट्री केल्याचे संकेत दिले आहेत. तर जेष्ठ नेते आणि कट्टर कार्यकर्ते यांना नेतृत्वाची संधी मिळाली आहे. या निवडीने कार्यकर्त्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

मुदाळ येथील हुतात्मा स्वामी-वारके सहकारी सूतगिरणीनंतर भुदरगड तालुक्यात दुसरी सूतगिरणी उभारण्याच्या हालचाली अधिक गतिमान झाल्याचे या निवडीतून स्पष्ट झाले आहे.



**निवड झालेले सदस्य**

खुला मतदारसंघ गट : बाबुराव सर्जेराव देसाई (कूर), प्राचार्य अर्जुन आनंदराव आबिटकर (गारगोटी), यशवंत केरबा नांदेकर (तिरवडे), धैयशील शिवाजीराव भोसले (आदमापूर), अशोक मारुती फराकटे (वाळवे), शहाजी गणपती देसाई (कडगांव), सुभाष रामराव चौगले (पंडेवाडी), अनंत बळवंत पाटील (सोळांकूर), संजय अनंत पाटील (ऐनी), रंगराव हरी मगदूम (नरतवडे), अतुल बापूसो पाटील (दारवाड), जयवंत तुकाराम चोरगे (पुष्पनगर), रामचंद्र कृष्णा शिऊडकर (केळेवाडी), दादासो विष्णू पाटील (कपिलेश्वर), उमाजी हिंदूराव पाटील (टिक्केवाडी), सुनिल परशराम जठार (वाघापूर).

**महिला राखीव गट:** वैशाली विलास डवर (डवरवाडी), विजया दिलीप देसाई (सोनाळी, गारगोटी).
**अनुसूचित जाती-जमाती गट :** बाळकृष्ण ज्ञानदेव भोपळे (खानापूर)
**भटक्या विमुक्त जाती-जमाती गट :** महादेव कृष्णा खोत (हणबरवाडी)
**इतर मागास प्रवर्ग मतदार गट :** उमेश अशोक तेली (शेणगाव)

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती करण्यासाठी टाकलेले हे एक मोठे धाडसी पाऊल ठरणार आहे. आकुर्डे येथील पठारावर लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असल्याचे समजते. तर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी ही एक मोठी राजकीय रणनीती ठरणार आहे.

# ऑक्टोबर पूर्वी थकीत पाणीपट्टी भरल्यास शंभर टक्के व्याज माफ

### आ.सुधीरदादा गाडगीळ; पालिकेच्या ठरावाला राज्य शासनाची मंजुरी

**सांगली : हॅलो प्रभात**

३१ ऑक्टोबर २०२५ पूर्वी थकीत पाणीपट्टी भरणाऱ्याना विलंब दंड आणि व्याज राज्य शासनाने शंभर टक्के माफ केले आहे.सांगली, मिरज आणि कुपवाड महापालिकेच्या हद्दीतील थकीत पाणीपट्टी धारकांसाठी ही मोठी आनंदाची बातमी आहे, अशी माहिती आ.सुधीरदादा गाडगीळ यांनी दिली.



आ.गाडगीळ म्हणाले, महापालिकेच्या महासभेने या संदर्भात मंजूर केलेल्या ठरावाला राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. दि. ३१ ऑक्टोबर २०२५ पूर्वी थकीत पाणीपट्टी एकरकमी भरणाऱ्या नागरिकांना १०० टक्के विलंब व्याज माफ करण्यात येणार आहे.या निर्णयामुळे नागरिकांना सुमारे १९ कोटी ६६ लाख रुपयांचे व्याज भरण्यापासून सूट मिळणार आहे. साहजिकच त्यामुळे महापालिका क्षेत्रातील आर्थिक भारात मोठा दिलासा मिळेल, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. महापालिकेच्या महासभेने ठराव (क्र. ५७७, दि. २० जुलै २०२३) मंजूर केला होता. या ठरावानुसार ज्या नागरिकांनी दि. ३१ ऑक्टोबर २०२५ पूर्वी संपूर्ण थकबाकी एकरकमी भरली, त्यांना विलंब व्याजामध्ये १०० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यासाठी २० सप्टेंबर २०२३ रोजी नगरविकास विभागाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला होता.

या ठरावाला मंजुरी मिळवण्यासाठी आ.गाडगीळ यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदन देत सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर त्यांच्या या पाठपुराव्याला सकारात्मक यश आले.दि. ६ऑगस्ट २०२५ रोजी शासन निर्णय जाहीर करण्यात आला.

# प्रा.पद्माकर जगदाळे यांचा वाढदिवस विविध उपक्रमानी साजरा




**सांगली : हॅलो प्रभात**

राष्ट्रवादी काँग्रेसचे शहरजिल्हाध्यक्ष प्रा.पद्माकर जगदाळे यांच्या ६४ व्या वाढदिवसा निमित्त सांगली जिमखाना येथे आमदार, खासदार, माजी नगर-सेवक, विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी प्रत्यक्ष भेटून शाल, बुके देऊन शुभेच्छांचा वर्षाव केला. तसेच मंत्री, आमदार, खासदार व राज्यातील विविध पक्षांच्या नेत्यांनी दूरध्वनीवरून शुभेच्छा दिल्या.

सांगली व मिरज येथे बैलगाडी, घोडागाडी शर्यती, मतदान नोंदणी, होड्यांच्या स्पर्धा, क्रीडा विकास असे विविध उपक्रम उत्साहात साजरे करण्यात आले. सांगली जिमखाना येथे आमदार इद्रिस नायकवडी, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष शेखर इनामदार , भाजपा शहरजिल्हा अध्यक्ष प्रकाश ढंग, राष्ट्रवादी काँग्रेसचे सांगली जिल्हाध्यक्ष निशिकांत पाटील, यांच्यासह यासह विविध पक्षांच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी शुभेच्छांचा वर्षाव केला. घोडागाडी व घोडेस्वारी स्पर्धा मिरज माळ येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. सचिव महेश साळुंखे व युवक राष्ट्रवादीचे अतुल भिसे संयोजन केले. खणभाग सांगली येथे मतदान नोंदणी व मोफत कार्ड वाटप कार्यक्रम किशोर जगदाळे यांनी घेतला. सांगली येथील सावली बेघर अनाथ आश्रमामध्ये स्नेहभोजनाचा कार्यक्रम उत्कर्ष खाडे व गणेश चौधरी यांनी घेतला. मिरज - अर्जुनवाड येथील कृष्णा घाटावर भव्य होड्यांच्या शर्यती मोठ्या उत्साहात पार पडल्या. महेश साळुंखे व अतुल भिसे यांनी या स्पर्धेच्या आयोजन केले.

सह्याद्री नगर मंगळवार बाजार येथे झिरो डाउन पेमेंट गाडी वाटपाचा कार्यक्रम प्रशांत माने यांनी घेतला.

# कोल्हापूर विमानतळाच्या विकासाबाबत बैठक संपन्न

### खा.धनंजय महाडीक यांची माहिती

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूर विमानतळाच्या विकासाबाबत नवी दिल्लीमध्ये बैठक झाली. नागरी हवाई वाहतुक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि खासदार धनंजय महाडिक यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत काही महत्वाच्या विषयांवर चर्चा झाली. कोल्हापूर विमानतळावरील धावपट्टी पहिल्या टप्प्यात २३०० मीटर करणे, त्यानंतर धावपट्टीचा विस्तार ३ हजार मीटर करणे, कोल्हापूरहून मुंबई आणि दिल्लीसाठी नियमित आणि योग्य वेळेत विमानसेवा सुरू व्हावी, कोल्हापूर विमानतळाच्या कॅटेगिरीमध्ये सुधारणा करावी, उच्च दर्जाची तंत्र सामुग्री कोल्हापूर विमानतळावर कार्यान्वित व्हावी, याबद्दल सविस्तर चर्चा झाली. ना.मुरलीधर मोहोळ यांनी कोल्हापूर विमानतळाच्या गतीमान विकासाबद्दल, विमानतळ प्राधिकरणाला स्पष्ट सूचना दिल्या.



कोल्हापूर विमानतळाच्या विकासासाठी आणि विस्तारीकरणासाठी नवी दिल्लीत बैठक झाली. हवाई वाहतूक खात्याचे राज्यमंत्री ना. मुरलीधर मोहोळ आणि राज्यसभेचे खा.धनंजय महाडिक यांनी कोल्हापूर विमानतळाच्या विकासासाठी आवश्यक प्रत्येक मुद्दयाचा आढावा घेतला. विमानतळ प्राधिकरणाचे संयुक्त महासंचालक सुरज मल, सदस्य एम.सुरेश, कार्यकारी संचालक सुजय डे, ए.एस. महेशा, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे, कोल्हापूर विमानतळाचे संचालक अनिल शिंदे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

कोल्हापूर विमानतळाला प्रवाशांचा मोठा प्रतिसाद आहे. त्यामुळे कोल्हापूरातून मुंबई आणि दिल्लीसाठी नियमित आणि सोयीस्कर वेळेत विमानसेवा सुरू व्हावी, अशी मागणी खासदार धनंजय महाडिक यांनी केली. कोल्हापुरातून दिल्लीसाठी थेट विमानसेवा सुरू करता येईल, त्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या पायाभूत सुविधा अधिक विकसित कराव्यात, विमानतळावर आवश्यक मनुष्यबळ उप-लब्ध करावे, याकडे खासदार महाडिक यांनी लक्ष वेधले. त्याला नामदार मुरलीधर मोहोळ यांच्यासह विमानतळ प्राधिकरणाच्या सर्वच वरिष्ठ अधिकार्यांनी मान्यता दिली. त्यामुळे या बैठकीतून कोल्हापूर विमानतळाच्या वेगवान विकासासाठी चालना मिळाल्याचे स्पष्ट झाले.

# आचार्य श्रीकांत महाराजांची ‘आधार’च्या दिव्यांग विद्यालयाला भेट



**तासगाव : हॅलो प्रभात**

येथील आधार शिक्षण संस्था संचलित दिव्यांग(मतिमंद व मूक बधिर ) विद्यालयास पूर्ण सेवा संस्थानचे अध्यक्ष आचार्य श्रीकांत महाराज यांनी भेट दिली. यावेळी गुरुमाता दिव्यामां अध्यक्ष महिला उत्थान फाउंडेशन, गोपालजी महाराज, सौ.अश्विनी चव्हाण, श्रीनिवास चव्हाण, ऋतुराज जाधव व पूर्ण सेवा संस्थानचे पदाधिकारी तसेच आधार शिक्षण संस्थेचे सचिव संजय राजमाने, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य मनोज शिंदे नाना आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ओळख करून देताना सांगितले, श्रीकांत महार-ाज मोटिवेशनल स्पीकर असून तरुणांसाठी प्रेरणास्थान आहेत. त्यांनी गुरुकुल शिक्षण पद्धतीने शिक्षण पूर्ण केले. तंत्र शिक्षण विशारद, योगा, आयुर्वेद, ज्योतिष आणि त्यांनी ब्रमारी विद्या मध्ये ध्वणी तंत्राचा शोध घेतला आहे. पूर्ण सेवा संस्थांनचे अध्यक्ष असून पूर्ण सेवा संस्थान हे भारतातिल लोकांना रोजगार उपलब्ध करून देते. गोशाळा डेव्हलपमेंट,मुलींचे शिक्षण यासारखे काम ही संस्थान करते. यावेळी दिव्यांग विद्यार्थ्यांना पूर्ण सेवा संस्थानच्या वतीने ब्लँकेट व खाऊचे वाटप करण्यात आले.

# निवृत्ती म्हणजे जीवनातील नवीन अध्यायाची सुरुवात

## रणधीर नाईक

**शिराळा : हॅलो प्रभात**

निवृत्ती म्हणजे केवळ करिअरचा शेवट नाही, ही जीवनातील एका नवीन अध्यायाची सुरुवात असून पुढे उत्साहाने आणि सकारात्मक मानसिकतेने निवृत्ती स्वीकारून, आपण खरोखरच आपल्या जीवनातील सर्वात सुंदर टप्पा बनवू शकतो. असे प्रतिपादन सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी उपाध्यक्ष रणधीर नाईक यांनी केले.

कांदे (ता.शिराळा)



येथे अजित रघुनाथ पाटील फौजी हे भारत मातेची २४ वर्षे सेवा बजावून सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार युवा नेते, माजी जि.प. सदस्य मा. रणधीर नाईक यांच्या शुभ हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

श्री. नाईक पुढे म्हणाले,फौजी अजित रघुनाथ पाटील यांना सुरूवातीपासूनच भारतमातेची सेवा करण्याचा ध्यास असल्यामुळे ते सैन्यात भरती झाले होते. घरच्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी २४ वर्षे सेवा बजावून ते सेवानिवृत्त झाले. प्रामाणिकपणे देशसेवा करून तरूणांसमोर आदर्श निर्माण करणाऱ्या या मनमिळाऊ सुपुत्राला त्यांच्या सेवानिवृत्तीच्या पुढील वाटचालीसाठी नाईक यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी वारणा साखर कारखान्याचे संचालक विजय पाटील, शिवाजी केन संचालक भोलासो पाटील, उपसरपंच संपत पाटील, रघुनाथ पाटील, छगन पाटील, अशोक पाटील, विश्वास पाटील, धनाजी पाटील, नाना पाटील, राजेंद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# आम आदमीच्या शहर उपाध्यक्षपदी आलिशा मुलाणी

**पुणे : हॅलो प्रभात**

येथील आलिशा मुल-ाणी यांची आम आदमी पार्टी महिला आघाडीच्या पुणे शहर उपाध्यक्षपदी निवड झाली. निवडीचे पत्र आम आदमी पक्षाचे महाराष्ट्रचे कार्याध्यक्ष अजित फाटके-पाटील व महाराष्ट्र राज्याचे सम न्वयक अमित मस्के, शहरा-चे अध्यक्ष सुदर्शन जगदाळे, महिला आघाडी पुणे शहराध्यक्ष सौ. सुरेखा भोसले यांच्या हस्ते निवडीचे पत्र देण्यात आले.आलिशा हिची निवड झाल्यावर पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष अभिनंदन केले. निवडीनंतर पक्ष वाढीसाठी आपण तळागाळापर्यंत सम ाजातील गोरगरीब व गरजूवंत नागरिकांसाठी आपण विशेष मदत करून त्यांच्या अडचणी सोडवण्यास प्राधान्य देणार असल्याचे मुलाणी यांनी सांगितले.




# स्वामी विवेकानंदांच्या देश रक्षाबंधन सोहळयात राख्यांचे संकलन

**कोल्हापूर : अनिल पाटील**

श्री स्वामी विवेकानंद चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने ‘एक राखी सीमेवरील जवानांसाठी’ हा उपक्रम गेली २६ वर्षे चालू आहे. या उपक्रमातून सैनिकांचे मनोधैर्य वाढण्यास साहाय्य होते, असे गौरवोद्गार निवृत्त सुभेदार एम्.एन्. पाटील यांनी काढले. श्री स्वामी विवेकानंद चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने ङ्गएक राखी सीमेवरील जवानांसाठीङ्ख या देशरक्षा बंधन उपक्रमाचे राजर्षी शाहू स्मारक येथे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शहरासह इचलकरंजी राधानगरी कागल भुदरगड गारगोटी टिटवे येथील ५० पेक्षा अधिक शाळा आणि महिला बचत गट या उपक्रमात सहभागी झाले होते.



या प्रसंगी ‘श्री स्वामी विवेकानंद चॅरिटेबल ट्रस्ट’चे अध्यक्ष किशोर घाटगे म्हणाले, कारगील युद्धा-पासून झालेला हा उपक्रम सीमेवरील जवानांसाठी राख्या पोचवण्यासाठी ट्रस्ट एक माध्यम आहे. मुलांप्रमाणे युवतींचीही लष्करात जाण्यासाठी संख्या वाढली पाहिजे. त्यासाठी कोल्हापूर शहरात ‘ताराराणी’च्या नावाने लष्करी महाविद्यालय चालू व्हायला हवे.

याप्रसंगी शहीद महाविद्यालयाच्या वीरमाता लक्ष्मीबाई पाटील, सुभेदार संजय पाटील, माजी लष्कर अधिकारी चंद्राहार पाटील, यांनी आपल्या मनो-गा मधून देश रक्षाबंधन कार्यक्रमात शुभेच्छा व्यक्त केल्या.

‘श्री स्वामी विवेकानंद चॅरिटेबल ट्रस्ट’चे सचिव राजेंद्र मकोटे यांनी कारगिल युद्धामुळे २६ वर्षांपूर्वी सुरु झालेला हा उपक्रम चांदा ते बांदा तसेच गोव्यामधील विविध शाळांमधून तसेच महिला बचत गटाकडून राबवला जात आहे आणि तो एक मूल्य शिक्षणाचा भाग बनला असल्याचे सांगितले.

# महिलांसाठी ‘नेटवर्किंग अविंग ऑफ क्रिएटिव्ह वुमेन’ कार्यशाळेचे आयोजन

**पुणे : हॅलो प्रभात**

विमान नगर येथील फिनिक्स मॉल येथे ‘नेटवर्किंग विंग ऑफ क्रिएटिव्ह वुमेन’ दोन दिवसीय प्रदर्शन आयोजित करण्यात आले. केवळ व्यापारीक मंच नव्हे, तर स्वास्थ, शिक्षा,पर्यावरण, सामाजिक संवाद, मनोरंजनचा सर्व वर्गातील महिलांना व्यासपीठ उप-लब्ध करण्यात आले. महिलांनी सुमारे ८० हुन अधिक स्टॉल विविध गुणवत्ता योग्य दरातील वस्तूंनी मांडले होते. महिलांचे उत्कृष्ट कार्याबद्धल उद्योग सन्मान प्रमाणपत्र प्रमुख पाहुणे सुनील तिं-गरे, जगदीश मुलिक, ीमती मीनल सर्वदे, श्रीमती स्मिता पाटिल, कर्नल राडकर, राहुल भांडारे, उमा ढोरे पाटील,दीपा शरण यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.

हॅलो प्रभात
# अहिल्यानगर
जिल्हा विशेष ■ शुक्रवार, ०८ ऑगस्ट २०२५





# सरला बेट विकास आराखडा व बंधाऱ्यास मंजूरी देणार

**मुख्यमंत्री फडणवीस**

**अहिल्यानगर : हॅलो प्रभात**

सद्गुरु संत गंगागिरी महाराजांच्या अध्यात्मिक परंपरेचा वारसा लाभलेल्या या भागातील भाविक नागरिकांच्या विकासाठी देवगाव शनि येथील उच्च पातळी बंधारा बांधकाम व सरला बेट विकास आराख़डा यांना मंजूरी देऊ,असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज देवगाव शनि येथे दिले.

देवगाव शनि ता. वैजापूर येथे सद्गुरु संत गंगागिरी महाराज यांच्या १७८ व्या अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमाची सांगता आज झाली. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री (गोदावरी, कृष्णा खोरे) राधाकृष्ण विखे पाटील, संत रामगिरी महाराज, जलसंपदा मंत्री (तापी, विदर्भ, कोकण) गिरीश महाजन,आ. रमेश बोरनारे,आ. विठ्ठल लंघे,सुरेश चव्हाणके, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्राचे



विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र,पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड तसेच अन्य अध्यात्मिक, धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईतून येतांना समुद्राचे दर्शन होते त्याप्रमाणे इथे आल्यावर भाविकांच्या सागराचे दर्शन झाले. १७८ वर्षांची परंपरा असलेला हा अध्यात्मिक सोहळा, भाविकांची शिस्त, तत्परता, त्यांची भाविकता हे सगळं मनाला विलक्षण आनंद देणारे आहे. देशहिताच्या विचाराला मारक असणाऱ्या शक्ती उदयास येतात तेव्हा हे सांस्कृतिक आक्रमण थोपविण्यासाठी संत शक्ती मैदानात उतरते. १७८वर्षाची परंपरा असलेल्या या अखंड हरिनाम सप्ताहाचा आज सांगता सोहळा अर्थात काल्याचे कीर्तन होते. त्यास मुख्यमंत्र्यांसह अनेक मान्यरांनी हजेरी लावली. यावेळी मोठ्या संख़्येने भाविक उपस्थित होते. कार्यक्रमात सुरुवातीला आलेल्या मान्यवरांचे सप्ताह समितीतर्फे सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्र्यांसह अन्य मंत्री महोदय व मान्यवरांनी फ ुगडी खेळून सांगता सोहळ्याचा आनंद लुटला.

## उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांनी पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवावे : सोमनाथ डफाळ

**कोपरगाव : हॅलो प्रभात**



गेल्या कित्येक वर्षांपासून सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कोपरगाव तालुक्यातील ब्राह्मणगाव येथील ज्ञानतंत्र बहुउद्देशीय संस्था राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत असलेल्या मान्यवरांचा गौरव करणार माहिति संस्थेचे अध्यक्ष सोमनाथ डफाळ यांनी दिली आहे.यावेळी डफाळ यांनी अधिक माहिती देतांना सांगितले की, आपण या समाजाचे काही देणे लागतो हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन या वर्षात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत असलेल्या मान्यवरांना सन्मान म्हणून पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार असून यात प्रामुख्याने प्रगतशील शेतकरी, आदर्श गोपालक, आदर्श समाजसेवक, आदर्श सरपंच, शिक्षण रत्न, युवा पत्रकार, आदर्श आरोग्य सेवक, वृक्ष मित्र, आदर्श आरोग्य सेविका, आदर्श ग्रामसेवक, आदर्श तलाठी, आदर्श उद्योजक या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत असलेल्या मान्यवरांचा गौरव करण्यात येणार असून यासाठी राज्यातील पात्र उमेदवाराकडून योग्य त्या कागदपत्रांसह आपला प्रस्ताव दि १५ ऑगस्ट पर्यंत ८७८८१९३८३९ या व्हाट्सअप क्रमांकावर अथवा अध्यक्ष ज्ञानतंत्र बहुउदेशीय संस्था ब्राम्हणगाव ता. कोपरगाव या पत्यावर पाठवावे, असे आवाहन अध्यक्ष सोमनाथ डफाळ यांनी केले आहे.

## कडेगाव नगरपंचायतच्या वतीने स्वच्छता मोहिम

**कडेगाव : हॅलो प्रभात**

जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ वाजे पासून कडेगाव नगर पंचायतच्या वतीने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी विशेष एकदिवशीय स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती कडेगांव नगरपंचायतीचे विद्यमान नगराध्यक्ष धनंजय देशमुख व मुख्याधिकारी डॉ.पवन म्हेत्रे यांनी कडेगांव नगरपंचायतीत आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

मोहिमेची सुरुवात अनुक्रमे कडेगाव नगर पंचायत परिसर,सेल्फी स्थळ, स्म शानभूमी पासून कोतमाई ओढा लगतचा परिसर ते दत्त मंदिर अशी असणार आहे. स्वच्छ झालेल्या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येणार आहे. ह्या मोहिमेचे मुख्य उद्धिष्ट म्हणजे नागरी भागातील सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन तसेच नागरिकांमध्ये स्वच्छते संबंधी जनजागृती घडवून आणणेचे आहे. सदर मोहिमेत लोक सहभाग आवश्यक असल्याने सर्वांनी स्वच्छता मोहिमे मध्ये आपले योगदान द्यावेअसे आवाहन करण्यात आले. यावेळी कडेगाव नगर पंचायतचे आरोग्य सभापती विजय गायकवाड , बांधकाम सभापती निलेश लंगडे, कडेगाव शहरातील समाजसेवी संस्था प्रतिनिधी, महिला बचत गट प्रतिनिधी, शाळा महाविद्यालयाचे शिक्षक व प्रतिष्टीत नागरिक उपस्थित होते.

## नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी उद्बोधन वर्ग संपन्न

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

येथील सद्गुरू गंगागीर महाराज संस्थेच्या गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स कॉलेज, येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रथम वर्ष कला वर्ग उद्बोधन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. समारंभाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील आणि कै. लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमापूजनाने झाली. सदर उद्बोधन वर्गासाठी प्राचार्य डॉ. एम. टी. सरोदे यांनी अध्यक्षीय पद स्वीकारले.

अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्य डॉ. एम. टी. सरोदे यांनी, विद्यार्थ्यांना आशीर्वादपर उद्बोधन करत ध्येय आणि उद्दिष्टे ठरवून सातत्याने प्रयत्न करण्याचा संदेश दिला. तसेच कॉलेजच्या विविध उपक्रमांत सहभागी होण्याचे आवाहन




केले.या प्रसंगी विविध विभाग प्रमुखांनी विद्यार्थ्यांना आपल्या विभागांची व उपक्रमांची माहिती दिली; त्यात प्रामुख्याने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर प्रा. डॉ. ए. बी. भागवत, विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती डॉ.रंजना वर्दे, विद्यार्थी विकास मंडळाविषयी प्रा. डॉ. एम. आर. यशवंत, परीक्षा विभागाविषयी प्रा. एस. डी. रणधीर, स्पर्धा परीक्षेविषयी प्रा. ए. पी. इंगळे, शॉर्ट टर्म कोर्सची माहिती प्रा. काकडे एस. एस., संशोधन विभागाविषयी प्रा. डॉ. व्ही. एल. गाढे, राष्ट्रीय सेवा योजने विषयी प्रा. डॉ. बी. ए. तऱ्हाळ, सांस्कृतिक विभागाची माहिती प्रा. डॉ. एस. पी. पवार, तसेच आय.क्यू. ए. सी. विषयी विस्तृत माहिती प्रा. डॉ. एन. व्ही. मालपुरे, एन.सी. सी. विभाग प्रा. डॉ. एस. बी. चौधरी, ग्रंथालय प्रा. सी. टी. खैरनार, जिमखाना विभाग प्रा. डॉ. व्ही. एस. पवार, महिला अत्याचार प्रतिबंधक समितीच्या डॉ. उज्वला भोर या सर्वांनी आपापल्या विभागाची माहिती देऊन विद्यार्थ्यांना उपलब्ध सेवा आणि सुविधा समजावून सांगितल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, स्वागत व प्राचार्यांचा परिचय प्रा. डॉ. एम. आर. यशवंत यांनी केले. सदर वर्गासाठी डॉ. बाळू वाघमोडे, डॉ. प्रमोद चव्हाण, प्रा.किरण पवार, डॉ. रावसाहेब दहे, प्रा.सुनील काकडे, प्रा. मनोज आवारे, प्रा. सुकेशिनी दुशिंग, प्रा. आरती खामकर, प्रा. जकरिया शेख, प्रा. प्रदीप जगझाप यांसह कला शाखेतील नवीन प्रवेशित विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते, सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सीमा दाभाडे यांनी केले, तर आभार प्रा. टी. वाय. रणदिवे यांनी मानले.

## खरा वारकरी समताधिष्ठित मूल्ये जोपासतो : ज्ञानेश्वर बंडगर



**राहुरी : हॅलो प्रभात**

समता हा वारकरी संप्रदायाचा पाया असून समताधिष्ठित मूल्ये जपणाराच खरा वारकरी आहे. असे प्रतिपादन ह. भ. प. ज्ञानेश्वर बंडगर यांनी केले. ते त्यांच्या 'होय होय वारकरी' ग्रंथाच्या मांडणीवर बोलत होते. विद्रोही सांस्कृतिक चळवळीने संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक सभागृहात ग्रंथ चर्चा आयोजित केली होती. बंडगर महाराज आपल्या ग्रंथावर बोलताना म्हणाले, संत गाडगेबाबा, गणपती महाराज या सामाजिक चळवळी चालवणाऱ्यांची वारकरी संप्रदायाचा इतिहास लिहिणाऱ्यांनी दखल घेतली नाही. गणपती महाराज यांनी शेकडो आंतरजातीय विवाह लावले. स्त्री पुरुष समता जोपासली. आजही ते उपेक्षित संत आहेत. खरा इतिहास समोर आणण्यासाठीच आपण होय होय वारकरी हा ग्रंथ लिहिल्याचे सांगितले. कार्यक्रमाचा प्रारंभ राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून करण्यात आली. कुराण तसेच डॉ सलीम शेख लिखित कुराण आणि छत्रपती शिवाजी महाराज या ग्रंथाच्या प्रती बंडगर महाराजांना भेट देण्यात आल्या. मधुकर विधाटे, शिरीष गायकवाड, सत्येंद्र तेलतुंबडे सर, ड. कुमार भिंगारे, नानासाहेब जुंधारे,डॉ सय्यद, प्रा. थोरात, रफिक सय्यद, संदीप कोकाटे, महेश साळवे, इजाज पिरजादे, स्वप्नील दिघे, ड .अमोल सोनवणे, ड गणेश जगधने, राजू ठाकर, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.अध्यक्षस्थान विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे जिल्हाध्यक्ष अशोक दिवे यांनी भूषविले. प्रास्ताविक जालिंदर घिगे यांनी केले. सूत्रसंचालन संदीप कोकाटे यांनी करून अजय साळवे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# गुरुमुळेच विद्यार्थ्यांची प्रगती : चंदन शिरसाठ

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यात गुरूची भुमिका महत्वाची असते. वीस वर्षांपूर्वी मी संजीवनी मधुनच इंजिनिअर झालो. येथिल प्राद्यापकांनी शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबरच समुह चर्चा, भाषा कौशल्य, अशा अनेक बाबींची रूजवण केली. येथिल ज्ञानाच्या जोरावर मी एकुण आकरा आण्विक अणुभट्यांचे काम करू शकलो. म्हणुन आवर्जुन सांगावेसे वाटते की गुरू मुळेच विद्यार्थ्यांची प्रगती होत असते, असे प्रतिपादन संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजचे माजी विद्यार्थी चंदन शिरसाठ यांनी केले.संजीवनी के. बी. पी. पॉलीटेक्निकमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेले विद्यार्थी व त्यांच्या पालकांच्या स्वागत कार्यक्रमात शिरसाठ प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते. संजीवनी ग्रुप ऑफ इंस्टीट्युटसचे मॅनेजिंग ट्रस्टी अध्यक्षस्थानी होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य ए. आर. मिरीकर, दुसरे पाहुणे माजी विद्यार्थी व सध्या पुणे येथिल शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालयात पदवी शिक्षण पुर्ण करीत असलेले रितेश औताडे, सर्व विभाग प्रमुख व डीन्स उपस्थित होते.

विद्यार्थी व पालकांची संख्या उल्लेखनिय होती.प्रारंभी प्राचार्य मिरीकर यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून सांगीतले की संजीवनीला यशस्वी परंपरा असुन ही ४३ वी बॅच आहे. तसेच संजीवनी पॉलीटेक्निकने राज्य व देश

**संजीवनी पॉलीटेक्निकमध्ये नवगतांचे स्वागत**




पातळीवर वेगवेगळ्या क्षेत्रात स्थापित केलेल्या कीर्तिमानांची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक जागरूकता, राहणीमान, सकारात्मक वृत्ती, स्वतःची चांगली ओळख निर्माण करणे आणि नवीन टेक्नॉलॉजी जाणुन घ्यावी, अशा मुल्यांचा अंगिकार करावा, असे सांगीतले.शिरसाठ पुढे म्हणाले, संजीवनी शैक्षणिक संकुलाचे संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे यांच्या मुळे तांत्रिक शिक्षण मिळाले. तिच परंपरा अध्यक्ष श्री नितिनदादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी श्री अमित कोल्हे समर्थपणे पुढे नेत असुन संजीवनीचा प्रवास थक्क करणारा आहे. युवा शक्ती ही देश घडवणारी असते. भारतीय अर्थ व्यवस्था झपाट्याने वाढत आहे. प्रत्येक क्षेत्रात प्रगती होत आहे. भारतीय उद्योगांचा जगात दबदबा आहे. यात इंजिनिअर्सची भुमिका अत्यंत महत्वाची मानली जाते. भविष्यात भरपुर संधी आहेत, परंतु वेगळेपण सिध्द करावे लागेल. समस्या सोडविण्याची क्षमता, परीवर्तनशिलता , शिकण्याची वृत्ती आणि व्यावहरीक अनुप्रयोग, इत्यादी बाबींचा स्वीकार करा. अध्यक्ष स्थानावरून अमित कोल्हे म्हणाले, पदवी एखाद्याला कामासाठी पात्र करते परंतु विविध कौशल्ये ही रोजगार मिळण्यायोग्य बनवतात. विविध कौशल्ये आत्मसात करण्यासाठी येथे सर्व बाबींची उपलब्धता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार भारत २०४७ साली देश विकसीत असेल, असा मानस आहे. यासाठी तरूणाई म्हणुन सध्याच्या पिढीची भुमिका महत्वाची असणार आहे. एखाद्या बाबतीत अपयश आले तर खचुन न जाता पुन्हा प्रयत्न करा. अशी प्रगती करा की भविष्यात आई वडीलांसह आम्हालाही अभिमान वाटला पाहीजे. भविष्यात चांगला रोजगार मिळण्याच्या दृष्टीने येथे जापनीज, कोरीयन, जर्मन व फ्रेंच भाषा शिकविण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. या भाषा शिकविण्याचे चांगले परीणाम सिध्द झाले आहे. प्रा. आय. के. सय्यद यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. डी.ए. पाटील यांनी आभार मानले.

## शरद इन्स्टिट्युटच्या विद्यार्थ्यांची करमतारा कंपनीत निवड



**यड्राव : हॅलो प्रभात**

येथील शरद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या १० विद्यार्थ्यांची करमतारा इंजिनिअरिंग लि. या आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित कंपनीत निवड झाली. महाविद्यालयातील मेकॅनिकल, इलेक्ट्रीकल, मेक्ट्रॉनिक्स विभागातील विद्यार्थ्यांना संधी मिळाली.मेकॅनिकल विभागातील अजय सिंग, जुवेद नाईकवडे प्रतिक गुरव, वैष्णवी खोत, इलेक्ट्रीकल विबागातील शारदा माने, ऐश्वर्या कोरे, अविष्कार तुरंबेकर, स्वरुप पाटील, मेक्ट्रॉनिक्स विभागातील तनुजा वडगे, तेजस जैन यांची निवड झाली.करमतारा इंजिनिअरिंग लिमिटेड हि जगभरात अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रात काम करते. इटली, ब्राझिल, दक्षिण आफ्रिका, यु.के., पेरुसह जगातील बहुतांशी देशात कंपनीचे काम आहे. कंपनी धातू आणि हार्डवेअर पुरवते. कंपनी ट्रान्समिशन लाईन टॉवर्स, फास्टनर्स, हार्डवेअर फिटिंग्ज, स्ट्रक्चरल स्टील आणि ॲक्सेसरीज बनवते. करमतारा इंजिनिअरिंग जगभरातील ग्राहकांना सेवा देते.महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग अंतर्गत सुरू असलेल्या ॲक्टीव्हिटी स्लॉटमध्ये मुलांच्याकडून ग्रुप डिसक्शन, इंटरव्ह्यु टेक्नीक्सचा सराव करून घेण्यात आला आहे. व्हॅप अंतर्गत व प्रोजेक्ट बेसड लर्निंग याचा फायदा विद्यार्थ्यांना कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी झाला.निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर, एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर अनिल बागणे यांनी अभिनंदन केले. ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट सेलचे डिन प्रा. ए.बी. जाधव, अधिकारी प्रा. नेहा प्रसून, प्रा. विद्या पाटील यांच्यासह सर्व डिन, विभागप्रमुख, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# बाळासाहेब थोरात यांचा कार्यकाळ शेतकऱ्यांसाठी आशादायी

**अहिल्यानगर: विनोद जवरे**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांचा वारसा सांभाळणारे माजी कृषिमंत्री बाळासाहेब थोरात आपल्या कृषी मंत्री पदाच्या काळात यांनी १ लाख शेततळ्यांच्या निर्मितीसह म हापिक अभियान, पिक विमा, ऑनलाइन योजना राबवताना महाराष्ट्राला देशातील सर्वाधिक कृषी उत्पन्न करणारे राज्य बनवले. हा आदर्श सध्याच्या कृषीमंत्र्यांनी घेणे गरजेचे असून महायुतीचे कृषिमंत्री वादग्रस्त ठरत असताना महाराष्ट्राला बाळासाहेब थोरात यांच्या शेतकऱ्यांसाठी शाश्वत मदतीच्या ठरलेल्या कार्यकाळाची आठवण होत आहे. महाराष्ट्रात सध्या महायुतीचे सरकार आहे आणि महायुतीचे अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, ड.माणिकराव कोकाटे यांचा कार्यकाळ शेतकऱ्यांसाठी कृतिशील ठोस योजना राबवण्यापेक्षा वादग्रस्ततेमुळे चर्चेत आले. त्यामुळे कृषी खात्याची महत्त्व कमी होते की काय अशी भीती सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये निम र्ण झाली.भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि शेतकऱ्यांचे मोठे महत्त्व आहे. म्हणून २००४ मध्ये ७५ हजारांच्या वर विक्रमी मताधिक्याने निवडून आल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी त्यांचे विश्वासू सहकारी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांना कोणते खाते पाहिजे असे विचारले. त्यावर शेतकरी पुत्र असलेल्या बाळासाहेब थोरात यांनी कृषिमंत्री होण्याची इच्छा



व्यक्त करून हे खाते मागितले. आणि ९ नोव्हेंबर २००४ रोजी महाराष्ट्राचे कृषी व जलसंधारण विभागाचे कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली.यानंतर कृषी खात्यामध्ये अमुलाग्र बदल करत त्यांनी कृषी विद्यापीठांना शेतकऱ्यांच्या दारी पोहोचवले. कृषी विद्यापीठातले संशोधक, शास्त्रज्ञ शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना मार्गदर्शन करू लागले. याचबरोबर जमिनीचा पोत, माती परीक्षण केंद्र सुरू केले. विद्यापीठांमार्फत विविध योजना लागू केल्या. राज्यभरात १ लाख शेततळ्यांची निर्मिती केली. महापीक अभियान ही योजना राबवली. शेतकऱ्यांसाठी कृषी दिंड्या, शिवार फेरीचे आयोजन केले. कृषी योजनांची ऑनलाईन माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली. शेतकऱ्यांना खत क्रेडिट कार्ड, पिक विमा, अपघाती, विमा अशा योजना राबवताना २००४ ते २००९ या कार्यकाळात महाराष्ट्राला देशातील सर्वाधिक कृषी उत्पन्न बनवणारे राज्य करण्याचा मान तत्कालीन कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या कार्यकाळात मिळाला.

याचबरोबर २००८ मध्ये यूपीए अध्यक्ष श्रीमती सोनिया गांधी, तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग व केंद्रीय कृषिमंत्री खा.शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळवून देण्यामध्ये त्यांचा मोठा वाटा राहिला. स्वर्गीय विलासराव देशमुख यांची अत्यंत विश्वासू सहकारी असलेले बाळासाहेब थोरात यांनी शेतकऱ्यांसाठी अनेक योजना तात्काळ राबवल्या. अवकाळी पाऊस, दुष्काळ, अतिवृष्टी, अशा संकटाच्या काळात शेतकऱ्यांना सातत्याने आणि तात्काळ भरीव मदत सरकारमार्फत मिळवून दिली. या खात्याला गौरव प्राप्त करून दिला. याचबरोबर जलसंधारण खात्याच्या माध्यमातून राज्यभरात साखळी बंधार्यांची निर्मिती केली.कृषी खाते हे अत्यंत महत्वाचे असून आज ७ ऑगस्ट रोजी कृषी क्रांतीचे जनक डॉ. स्वामीनाथन यांचा जन्मदिन आहे. या खात्यामध्ये डॉ.स्वामीनाथन व हरितक्रांतीचे प्रणेते डॉ अण्णासाहेब शिंदे यांनी हरितक्रांती घडून आणली. हा समृद्ध वारसा मा. कृषी व महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी जपला.तर याउलट सध्या महायुतीचे विविध कृषिमंत्री मात्र वादग्रस्त ठरले आहेत. अनेकांची खाती बदल झाली आहे. कृषी खात्याचे महत्व कमी होते की काय अशी भीती वाटत असताना महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना बाळासाहेब थोरात यांच्या चांगल्या आणि शेतकऱ्यांना शाश्वत व तात्काळ मदत करणाऱ्या कार्यकाळाची आठवण होत आहे.

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



## सुवर्णसंधी



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ५000/- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ७000/- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | १0000/- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,
छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या
जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै.हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळिवण्यासाठी संपर्क : **9021651976**